
## केंद्रीय पथक महाराष्ट्रातील दुष्काळाची करणार पाहणी



**नवी दिल्ली :** महाराष्ट्रातील सुमारे दोन-तृतीयांश भूभाग दुष्काळाने प्रभावित झाल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने राज्यातील परिस्थितीची गंभीर दखल घेतली आहे. दुष्काळी परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी महाराष्ट्रात केंद्रीय पथक पाठविण्यात येणार असून केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण आणि ग्रामीण विकासमंत्री शिवराजसिंह चौहान वरिष्ठ अधिकाऱ्यांसह हा दौरा करणार आहेत. नवी दिल्लीतील पुसा येथील भारतरत्न सी. सुब्रमण्यम सभागृहात आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय कृषी संमेलन-रब्बी अभियानाच्या उद्घाटन सत्रात ते बोलत होते. महाराष्ट्रातील सुमारे दोन-तृतीयांश क्षेत्र दुष्काळाच्या विळख्यात असल्याचे नमूद करीत चौहान यांनी केंद्र सरकार राज्यातील परिस्थितीबाबत गंभीर असल्याचे स्पष्ट केले. आपण स्वतः वरिष्ठ अधिकाऱ्यांसह दौरा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १९ ◆ अंक ७२
www.ramprahar.com
◆ मंगळवार, २९ सप्टेंबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

अल्पवयीन मुलीवर अत्याचार; आरोपीला सक्तमजुरी/२
रायगड जि.प.तर्फे आशा स्वयंसेविकांचा सन्मान/५
'सीकेटी'च्या कुस्तीपटूंचे ग्रीकोरोमन स्पर्धेत सुयश/८

### 'वोटचोरी'चा आरोप करणाऱ्यांनी आत्मपरीक्षण करावे!

# तीनही निवडणूक आयुक्तांच्या स्पष्टोक्तीमुळे राहुल गांधींचा फेक नॅरेटिव्ह उद्ध्वस्त

### आमदार प्रशांत ठाकूर यांचा विरोधकांवर घणाघात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एसआयआरसह सर्व प्रक्रिया एकमताने पार पडल्या असून निवडणूक आयोगामध्ये कोणताही 'डिफरन्स ऑफ ओपिनियन' नसल्याचे तीनही निवडणूक आयुक्तांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि त्यांच्या सहकाऱ्यांकडून निवडणूक प्रक्रिया व आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करण्यासाठी उभा करण्यात आलेला कथित 'फेक नॅरेटिव्ह' आता जनतेसमोर उघड झाला आहे, अशा शब्दांत भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी सोमवारी (दि.२८) पत्रकार परिषदेत विरोधकांवर घणाघात केला.



पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात झालेल्या या पत्रकार परिषदेस महापौर नितीन पाटील, पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंजारराव, नगरसेवक रवींद्र जोशी, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

सरकारवर एकही भ्रष्टाचाराचा डाग नाही म्हणून विरोधी पक्ष हवालदिल झाला आहे. प्रसिद्धीसाठी स्टेटमेंट आणि मोर्चे काढण्याचा प्रयत्न होत आहे, मात्र जनता फारशी त्यांना विचारात घेत नाही, असे सांगून सरकारवर आरोप करून थकले. त्यात यश आले नाही, म्हणून आता सरकारी यंत्रणांवर अविश्वास निर्माण करून जनतेमध्ये संभ्रम पसरवण्याचे काम विरोधी पक्ष करीत असून या त्यांच्या जनतेची दिशाभूल करणाऱ्या कृतींचा आमदार प्रशांत ठाकूर यांनी धिक्कार केला.

प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी पुढे म्हटले की, राहुल गांधी संविधानाचे पुस्तक हातात घेऊन संवैधानिक संस्थांवर सातत्याने आरोप करीत आहेत. संविधानाने निर्माण केलेल्या संस्थांवरील जनतेचा विश्वास कमी करण्याचा प्रयत्न करणे ही लोकशाहीसाठी चिंतेची बाब आहे. संविधानाचा आधार घेताना त्याच संविधानाने निर्माण केलेल्या लोकशाही व्यवस्था आणि संवैधानिक संस्थांचा आदरही राखला पाहिजे. संवैधानिक संस्थांवर आरोप करण्यापूर्वी ठोस तथ्ये आणि पुरावे जनतेसमोर मांडणे आवश्यक आहे. 'वोटचोरी'चे आरोप करणाऱ्यांनी प्रथम आत्मपरीक्षण करावे.

कॅबिनेट सेक्रेटरींकडे पाठविण्यात आलेले पत्र कोणत्याही नीतीगत किंवा धोरणात्मक विषयाशी संबंधित नव्हते. ते डेप्युटेशनवरील नियुक्तीशी संबंधित पत्र होते, मात्र या पत्राला वेगळे स्वरूप देऊन निवडणूक आयोगामध्ये मतभेद असल्याचा आभास निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. कालच्या पत्रकार परिषदेत या संदर्भातील वस्तुस्थिती स्पष्ट झाली आहे. फॉर्म क्रमांक ६च्या संदर्भातही जाणीवपूर्वक संभ्रम निर्माण केला जात असल्याचा आरोप करण्यात आला. सर्वोच्च न्यायालयाने ज्या स्वरूपात फॉर्म क्रमांक ६ वैध ठरवला आहे, त्याच स्वरूपात तो वापरला जात असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे या विषयावर राजकीय आरोप करण्याऐवजी अधिकृत प्रक्रिया आणि न्यायालयीन निर्णय जनतेसमोर ठेवणे गरजेचे आहे, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी नमूद केले. **(पान २ वर..)**



## महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी नगरसेवक परेश ठाकूर यांची बिनविरोध निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनची (एमबीए) ८४वी चतुर्वार्षिक वार्षिक सर्वसाधारण सभा नागपूर येथे पार पडली. या सभेनंतर सन २०२६-२०३० या कालावधीसाठी असोसिएशनच्या नवीन कार्यकारिणीची स्थापना करण्यात आली. असोसिएशनचे यापूर्वी अध्यक्ष म्हणून कार्यरत असलेले अरुण लखानी यांची बिनविरोध फेरनिवड करण्यात आली असून रायगड जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब म्हणजे पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते व विद्यमान नगरसेवक, बॅडमिंटन ऑर्गनायझेशन ऑफ रायगड (बीओआर)चे अध्यक्ष परेश ठाकूर यांची महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे.



> *माझ्यावर विश्वास व्यक्त करून साथ दिल्याबद्दल सर्व पदाधिकारी व सदस्यांचे मनःपूर्वक आभार! महाराष्ट्रातील बॅडमिंटनच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच खेळाडूंना अधिक चांगल्या संधी, सुविधा आणि व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी प्रामाणिकपणे व सातत्याने योगदान देण्याचा माझा सदैव प्रयत्न राहील. आपल्या विश्वासाला आणि अपेक्षांना न्याय देण्यासाठी मी कटिबद्ध आहे.*
>
> **-परेश ठाकूर, उपाध्यक्ष,** महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशन

सन २०२६-२०३० या कालावधीसाठी असोसिएशनच्या नवीन कार्यकारिणीच्या विविध पदांसाठी एकूण ५१ नामनिर्देशन अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी २५ सदस्यांची एमबीएच्या गव्हर्निंग कौन्सिलवर सन २०२६-२०३० या कालावधीसाठी निवड करण्यात आली. **(पान २ वर..)**

### पनवेलसह रायगडच्या क्रीडा क्षेत्रासाठी अभिमानाची बाब -आमदार प्रशांत ठाकूर

या निवडीबद्दल प्रतिक्रिया देताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, बॅडमिंटन ऑर्गनायझेशन ऑफ रायगडचे अध्यक्ष म्हणून परेश ठाकूर यांनी उत्कृष्टपणे काम करताना रायगड जिल्ह्यातील तसेच पनवेल परिसरातील तरुण खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचे आणि त्यांना अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्याचे सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांच्यावर आता महाराष्ट्र उपाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. ही बाब पनवेलसह रायगडच्या क्रीडा क्षेत्रासाठी आनंदाची आणि अभिमानाची आहे. पनवेल शहरात तब्बल १० कोर्टचे अत्याधुनिक बॅडमिंटन संकुल उभारण्यात येत आहे तसेच पनवेलपासून खारघरपर्यंत विविध ठिकाणी बॅडमिंटनसाठी आवश्यक क्रीडा सुविधा आणि कोर्ट उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे स्थानिक खेळाडूंना सरावासाठी अधिक चांगल्या सुविधा मिळण्याबरोबरच त्यांच्या गुणवत्तेला वाव मिळणार आहे. परेश ठाकूर यांना रायगडमध्ये बॅडमिंटनच्या विकासासाठी केलेल्या कार्यानंतर आता महाराष्ट्राच्या व्यापक पातळीवर काम करण्याची संधी मिळणार आहे. त्यांच्या नव्या जबाबदारीचा लाभ पनवेल, रायगडसह संपूर्ण महाराष्ट्रातील बॅडमिंटन खेळाडूंना आणि क्रीडा क्षेत्राला होणार आहे, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले.

## 'जेवढे प्रत्यक्ष काम, तेवढेच देयक'

### ७७ कृत्रिम व २९ नैसर्गिक विसर्जन स्थळांची प्रशासनाकडून पाहणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिकेने नागरिकांच्या सोयीसाठी उभारलेल्या कृत्रिम विसर्जन तलावांच्या माध्यमातून नागरिकांची एक उत्कृष्ट सेवा घडली आहे, मात्र या सेवाभावी कार्यात कोणताही घोटाळा अथवा आर्थिक गैरव्यवहार सिद्ध झालेला नसताना नगरसेविका लीना गरड यांनी केवळ सवंग प्रसिद्धीसाठी आणि स्वतःचा बडेजाव करण्यासाठी महापालिकेची बदनामी करण्याचा घाट घातला आहे.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पनवेल महापालिकेच्या वतीने उभारण्यात आलेल्या विसर्जन तलावांच्या कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याचा बिनबुडाचा आरोप शिवसेना (उबाठा गट) नगरसेविका लीना अर्जुन गरड यांनी केला होता. त्यावर सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार यांनी सोमवारी (दि.२८) पत्रकार परिषदेत भूमिका स्पष्ट करीत आरोप फेटाळून लावले. विसर्जन तलावांची कामे आणि त्यासोबत करण्यात आलेल्या विविध सुविधांची प्रत्यक्ष पाहणी, मोजमाप व मूल्यांकन प्रशासनाकडून करण्यात येत असून जेवढे प्रत्यक्ष काम झाले आहे, तेवढेच देयक अदा केले जाईल, असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. **(पान २ वर..)**

### प्रक्रिया पूर्ण होण्याआधीच गैरव्यवहाराचा निष्कर्ष कसा?

विसर्जन तलावांसाठी संबंधित कामांची कंत्राटे देण्यात आली असली तरी गणेशोत्सवाच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या सर्व कामांची अंतिम प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच संबंधित कंत्राटदारांना देयके अदा केली जाणार आहेत. त्यामुळे कामे पूर्ण होण्यापूर्वीच अथवा अंतिम मोजमाप व तपासणी होण्याआधीच संपूर्ण प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याचा निष्कर्ष काढणे योग्य नसल्याचे पालिकेने स्पष्ट केले आहे. प्रशासनाकडून सध्या विविध विसर्जन स्थळांवरील कामांची प्रत्यक्ष पाहणी केली जात आहे. कोणत्या ठिकाणी किती काम झाले, कंत्राटातील निकषांनुसार काम पूर्ण झाले आहे का, उपलब्ध करून देण्यात आलेल्या सुविधा प्रत्यक्षात किती प्रमाणात आहेत याची तपासणी करण्यात येत आहे. त्यानंतर मोजमाप आणि मूल्यांकनाच्या आधारे अंतिम देयक निश्चित केले जाणार आहे. "कंत्राटदाराने कागदावर किती काम दाखविले यापेक्षा प्रत्यक्षात किती काम झाले याला महत्त्व आहे. प्रत्यक्ष पाहणी आणि मोजमापानंतरच नियमानुसार देयक दिले जाईल," अशी भूमिका ॲड. प्रकाश बिनेदार यांनी स्पष्ट केली आहे.

## आज राज्यात भव्य रोजगार मेळावे

**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत २९ सप्टेंबर रोजी राज्यभरात ८०० ठिकाणी रोजगार महाकुंभ-महाराष्ट्र रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे. या रोजगारविषयक उपक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे.

राज्यातील युवकांना त्यांच्या परिसरातच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा या मेळाव्यांचा मूळ उद्देश असून हा उपक्रम राज्यातील जिल्हा, तालुका व औद्योगिक परिसरांमध्ये राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने बेरोजगार उमेदवारांनी आपले आधारकार्ड, बायोडाटा व शैक्षणिक कागदपत्रांसह उपस्थित राहावे. मेळाव्यात अनेक नामांकित कंपन्या सहभागी होणार असून इच्छुक उमेदवारांना तत्काळ रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे.

## नेपाळमध्ये पुन्हा निसर्गाचा प्रकोप; २४ जणांचा मृत्यू

**काठमांडू : वृत्तसंस्था**

गेल्या महिन्यात नेपाळमध्ये आलेल्या पुरात हजारो लोकांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर महिनाभराने आता नेपाळपमध्ये पुन्हा एकदा नैसर्गिक दुर्घटना घडली आहे. येथील एका पर्वताचा मोठा भाग अचानक तुटून खालून वाहत असलेल्या काली गंडकी नदीत कोसळला. यादरम्यान पूर आणि भूस्खलनामुळे देशातील अनेक जिल्ह्यांत मोठ्या प्रमाणात जीवितहानी झाली असून आतापर्यंत सुमारे २४ जणांचा मृत्यू झाल्याचे आणि १४ बेपत्ता झाल्याचे वृत्त समोर आले आहे.

या घटनेबाबतचे काही व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. त्यातच नेपाळमध्ये सातत्याने कोसळत असलेल्या पावसामुळे परिस्थिती आणखी बिघडताना दिसत आहे.





## रायगडात आजपासून गौरा-गणपती उत्सव

**अलिबाग : प्रतिनिधी**

भाद्रपद शुद्ध चतुर्थीला सुरू होणारा गणेशोत्सव संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. अनंत चतुर्दशीला या उत्सवाची सांगता झाली. काही ठिकाणी २१ दिवसांचे गणपती आहेत. अशातच रायगड जिल्ह्यात मंगळवारी (दि. २९) गौरा-गणपतीचे आगमन होणार आहे.

अनंत चतुर्दशीनंतर येणाऱ्या चतुर्थीला गणेशाचे आगमन होते. या बाप्पाला रायगड जिल्ह्यात गौरा-गणपती म्हणतात, तर काही भागात साखरचौथीचा गणपती असेही संबोधले जाते. दीड दिवसांनी त्याचे विसर्जन केले जाते. पूर्वी पनवेल परिसरात हा उत्सव साजरा केला जात असे. आता संपूर्ण रायगडात हा उत्सव साजरा केला जातो.



पूर्वी भाद्रपद शुद्ध चतुर्थीला सुरू होणाऱ्या पारंपरिक गणेशोत्सवात पनवेल, उरण परिसरात बाजारपेठांमध्ये १० दिवस खरेदीसाठी गर्दी असायची. त्यामुळे छोट्या व्यावसायिकांना गणेशोत्सव साजरा करता येत नसे. त्यामुळे त्यांनी अनंत चतुर्दशीनंतर येणाऱ्या चतुर्थीला गणपती आणून दीड दिवसांचा गणेशोत्सव साजरा करण्यास सुरुवात केली.

यानंतर पेण, अलिबाग तालुक्यांमध्ये हा उत्सव साजरा होऊ लागला. आता दक्षिण रायगडातदेखील हा उत्सव साजरा केला जातो. घरगुती गणपतीबरोबरच सार्वजनिक मंडळेसुद्धा हा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करतात. दरवर्षी गौरा-गणपतींच्या संख्येत वाढ होत आहे.

गौरा-गणपतीच्या आगमनाची तयारी सुरू आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी आकर्षक सजावट, विद्युत रोषणाई तसेच विविध धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले आहे. काही मंडळांनी आरोग्य, जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित केले आहेत.

# राज्याच्या आर्थिक प्रणालीत बदलांसाठी आराखडा तयार करावा -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील निधी उभारणी, लेखांकन आणि उपलब्ध संसाधनांचे कार्यक्षम विनियोजन या तीन आघाड्यांवर अधिक वेगाने काम करण्याची गरज असून महाराष्ट्र शाश्वत सार्वजनिक वित्त समितीने याचा आढावा घ्यावा. समितीच्या शिफारशींवर शासन गांभीर्याने अंमलबजावणी करून आर्थिक व प्रशासकीय प्रणालीत बदल घडवेल. यासंदर्भात सहा महिन्यात आवश्यक सुधारणा करून आराखडा तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.



सह्याद्री अतिथिगृहात राज्याच्या कर आणि करेतर महसुलात वाढ करण्याच्या दृष्टीने उपाययोजना सुचविण्यासाठी गठीत महाराष्ट्र शाश्वत सार्वजनिक वित्त समितीची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, समितीचे अध्यक्ष विजय केळकर, समितीचे सदस्य कार्थिक मुरलीधरन, रवी शंकर, माजी मुख्य सचिव डॉ.नितिन करीर, महसूल व वने विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, ऊर्जा विभाग प्रधान सचिव आभा शुक्ला, वित्त विभाग अपर मुख्य सचिव विकासचन्द्र रस्तोगी, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी, वित्त विभागाचे प्रधान सचिव विजय वाघमारे,आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पारंपरीक महसूल संकलनाच्या पध्दतींपलीकडे जावून राज्याच्या संपूर्ण विकास आराखड्याला वित्त पुरवठा करण्यासाठी साधनसंपत्ती उभारण्याचे नवे मार्ग शोधणे आवश्यक आहे. राज्याच्या विविध यंत्रणाकडे सुमारे सहा ते सात हजार कोटी रुपयांचा निधी चार टक्के व्याजदराने गुंतवलेला असताना राज्य शासनाला बाजारातून आठ ते नऊ टक्के व्याजदराने कर्ज घ्यावे लागते. ही विसंगती दूर करून उपलब्ध निधीचा अधिक परिणामकारक वापर करण्यासाठी योग्य यंत्रणा उभारावी लागेल. या यंत्रणांचे आर्थिक स्वातंत्र्य अबाधित ठेवतानाच त्यांच्या निधीला सुरक्षितता देणारी अभिनव आर्थिक साधने शोधावी लागतील, असेही त्यांनी सांगितले.


खर्च व्यवस्थापन अधिक कार्यक्षम करण्याची गरज व्यक्त करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, विविध प्रकल्प वेळेत पूर्ण होणे गरजेचे असते. निधी नियोजनातील त्रुटींमुळे गुंतवणुकीचा अर्थव्यवस्थेवरील अपेक्षित गुणक परिणामही दिसून येत नाही. त्यामुळे राज्याच्या संपूर्ण कारभाराचे नव्याने परीक्षण करून खर्चाची परिणामकारकता वाढवावी लागेल. तज्ञ समितीची स्थापना केवळ औपचारिकता म्हणून केलेली नसून तिच्या शिफारशींनुसार शासनाच्या विद्यमान पद्धती आणि प्रणालींमध्ये बदल करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार; आरोपीला १० वर्षे सक्तमजुरी

**माणगाव : प्रतिनिधी**

अल्पवयीन मुलीला आत्महत्येची धमकी देत भेटण्यासाठी बोलावून तिच्यावर अत्याचार केल्या प्रकरणी आरोपी निलेश बाबुराव दुर्गवले याला माणगाव येथील विशेष न्यायालयाने दोषी ठरवून १० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सुनावली. तसेच विविध कलमांन्वये दंडाची शिक्षा सुनावत पीडितेला नुकसान भरपाईपोटी ५० हजार रुपये देण्याचे आदेश न्यायालयाने दिले. विशेष न्यायाधीश एम. के. पाटील यांनी २८ सप्टेंबर २०२६ रोजी हा निकाल दिला.

ही घटना म्हसळा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका गावातील बंद घराच्या पाठीमागील पडवीत घडली होती. आरोपीने पीडित मुलीला, 'तू भेटायला आली नाहीस तर मी आत्महत्या करीन,' अशी धमकी देऊन तेथे बोलावले आणि तिच्यावर अत्याचार केला. यापूर्वीही आरोपीने पीडितेवर अत्याचार केल्याचे तपासात समोर आले होते. या प्रकरणी म्हसळा पोलीस ठाण्यात आरोपी विरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास श्रीवर्धन उपविभागाचे तत्कालीन उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत स्वामी तसेच म्हसळा पोलिस ठाण्याच्या मपोसई वाय. पी. बांडे



यांनी केला. तपास पूर्ण करून आरोपी विरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

माणगाव–रायगड येथील विशेष न्यायालयात झालेल्या सुनावणी दरम्यान फिर्यादी, पीडित मुलगी तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांची साक्ष आणि वैद्यकीय पुरावे सरकार पक्षासाठी महत्त्वाचे ठरले. अतिरिक्त शासकीय अभियोक्ता योगेश तेंडुलकर यांनी सरकार पक्षाच्या वतीने साक्षीदार तपासले. न्यायालया समोर सादर झालेल्या साक्षी–पुराव्यांच्या आधारे आरोपी निलेश बाबुराव दुर्गवले याला दोषी ठरविण्यात आले. भारतीय दंड विधान कलम ३७६ (२) (जे) अन्वये १० वर्षे सक्तमजुरी याशिवाय पीडितेला नुकसान भरपाई म्हणून ५० हजार रुपये देण्याचे आदेशही न्यायालयाने दिले.

## वडगाव शाळेच्या परिवर्तनाची दिल्लीतील संस्थेकडून दखल

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

जिद्द, चिकाटी आणि कुशल नेतृत्वाच्या जोरावर ग्रामीण भागातील शाळेचा कायापालट कसा घडवून आणता येतो, याचे प्रेरणादायी उदाहरण खालापूर तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, वडगावने घालून दिले आहे. शाळेचे मुख्याध्यापक सुभाष रामचंद्र राठोड यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या शैक्षणिक व भौतिक परिवर्तनाची विशेष दखल राष्ट्रीय स्तरावरील (National Institute of Educational Planning and Administration), नवी दिल्ली यांनी घेतली आहे.

प्राचार्य संघमित्रा त्रिभुवन यांनी तयार केलेल्या विशेष केस स्टडीच्या माध्यमातून वडगाव शाळेच्या परिवर्तनाची आणि मुख्याध्यापक राठोड यांच्या नेतृत्वाची राष्ट्रीय पातळीवर नोंद झाली आहे.सन २०२३ मध्ये सुभाष राठोड यांनी वडगाव शाळेच्या मुख्याध्यापकपदाची जबाबदारी स्वीकारली, त्यावेळी शाळेची पटसंख्या केवळ ३२ होती. विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्यासाठी त्यांनी 'शाळा गैरहजर विद्यार्थ्यांच्या दारी' हा उपक्रम राबवून थेट विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन पालकांशी संवाद साधला.

या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे शाळेची पटसंख्या पुढीलप्रमाणे वाढली सन २०२५–२६ : १०३ विद्यार्थी झाली.पटसंख्येतील ही वाढ शाळेच्या कार्यपद्धतीवरील पालकांचा वाढता विश्वास दर्शविणारी ठरली.या प्रयत्नांना 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' टप्पा–२ अभियानात यश मिळाले. वडगाव शाळेने रायगड जिल्ह्यात प्रथम क्रमांक, तर मुंबई विभागात द्वितीय क्रमांक मिळवला. या कामगिरीबद्दल शाळेला १५ लाख रुपयांचे पारितोषिक प्राप्त झाले.

शाळेच्या विकासासाठी सीएसआर निधीच्या माध्यमातून विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामध्ये संगणक लॅब, डिजिटल क्लासरूम, सर्व वर्गांमध्ये विद्युत सुविधा आणि स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था यांचा समावेश आहे.पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण व संगोपन, ओला–सुका कचरा वर्गीकरण, गांडूळ खत व कंपोस्ट खत निर्मिती उपक्रमही राबविण्यात आले आहेत.

# पनवेल मनपातर्फे दशकपूर्ती महोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन -महापौर नितीन पाटील

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या स्थापनेला १० वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर १ ऑक्टोबर २०२६ ते ३१ डिसेंबर २०२६ या कालावधीत भव्य 'दशकपूर्ती महोत्सव' साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने विविध भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती महापौर नितीन पाटील यांनी आज मुख्यालयात घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दिली. यावेळी उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृह नेते प्रकाश बिनेदार,नगरसेवक तथा माजी सभागृह नेते परेश ठाकूर, स्थायी समिती सभापती बबन मुकदम आणि आयुक्त मंगेश चितळे, परिवहन उपायुक्त कैलास गावडे उपस्थित होते.

दशकपूर्ती महोत्सावाचा प्रारंभ १ ऑक्टोबर रोजी होणार आहे. यादिवशी महापालिकेच्या सर्व कार्यालयांत येणाऱ्या अभ्यागतांचे पुष्प देऊन स्वागत करण्यात येणार असून, सकाळी ११ वाजता सर्व कार्यालयांमध्ये विशेष स्वागत समारंभ आयोजित केला जाईल तसेच महापालिका मुख्यालय व महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व पुतळ्यांना विद्युत रोषणाई होणार आहे.

दशकपूर्ती महोत्सावात प्रमुख १५ विशेष कार्यक्रम होणार आहेत यामध्ये मुख्य समारंभात राज्यातील प्रमुख मान्यवरांच्या (माननीय मुख्यमंत्री महोदयांसह) उपस्थितीत महोत्सवाचा मुख्य सोहळा पार पडेल. पनवेल मनपाच्या १० वर्षांतील प्रवासावर दशकपूर्ती निमित्त विकास प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. याबरोबर महिला, युवा, विद्यार्थी, व्यापारी, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग बांधव, प्रशासन, पत्रकार आणि गृहनिर्माण संस्था अशा १० विविध घटकांसाठी २० ठिकाणी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येईल. तसेच महापौर चषक सेलिब्रिटी क्रिकेट स्पर्धा, महापौर करंडक राष्ट्रीय शाहिरी स्पर्धा, विशेष स्मरणिका महानगरपालिका गीत, मराठी नाट्य महोत्सव, Gen-Z रील्स स्पर्धा आयोजित केली जाईल.तसेच दशकपूर्ती व्याख्यानमाला, नशामुक्ती वॉकेथॉन, आपुलकी मेळावा, विविध स्पर्धांतील विजेत्यांचा गौरव आणि पारितोषिक वितरणाने महोत्सवाने कार्यक्रमाची सांगता होईल.

या पत्रकार परिषदेत महापालिकेच्यावतीने सेवा संकल्प अभियानानिमित्त १७ ऑक्टोबरपर्यंत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, याचीही माहिती महापौरांनी दिली. या अभियानांतर्गत जेष्ठ नागरिक, दिव्यांग बांधव, एकल महिला आणि नागरिक यांच्यासाठी सेवा संकल्प अभियानातील विविध घटकांची माहिती देण्यासाठी दिनांक ८ ऑक्टोबर गुरूवारी आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

यामध्ये वैद्यकिय आरोग्य विभागाच्यावतीने आरोग्य तपासणी शिबिर, महिला आरोग्य काळजी , रक्तदान शिबिर, अवयवदान संकल्प अभियानाचे आयोजन करण्यात येणार आहे. घनकचरा व आरोग्य विभागाच्यावतीने " स्वच्छता ही सेवा–२०२६", कचरा वर्गीकरण व कंपोस्टींग, प्लास्टिकमुक्ती जागरूकता असे कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. निवडणूक विभागाच्यावतीने मतदार जागरूकता व नोंदणी कार्यक्रम, उद्यान विभागाच्यावतीने वृक्षारोपण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने डिजिटल साक्षरता , सायबर फ्रॉड जागरूकता , वीरगाथा आणि सैनिकांचा सन्मान, दिव्यांग जन सहकार्य, रस्ते सुरक्षा, व्यसनमुक्त भारत जागरूकता, योग आणि ध्यान सत्र अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती महापौरांनी दिली.

सेवा संकल्प अभियान– सांगता समारोहाचे आयोजन दिनांक १६ ऑक्टोबर शुक्रवार सकाळी १०:३० ते १२:३० यावेळे आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात करण्यात येणार आहे. यामध्ये खुली चित्रकला ,रांगोळी स्पर्धा, सेवा संकल्प अभियानातील माहिती देणारी बाईक रॅली काढण्यात येणार आहे तसेच 'जनसेवक महाकुंभ' हा मुख्य समारोप कार्यक्रम नाट्यगृहात होईल.

यावेळी आयुक्त मंगेश चितळे यांनी सांगितले की, महापालिका कार्यक्षेत्रातील प्रत्येक समाजघटकाला या दशकपूर्ती निमित्ताने होणाऱ्या कार्यक्रमामध्ये समाविष्ट केले जाईल. त्यांच्यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येईल. दशकपूर्तीच्या निमित्ताने जे प्रदर्शन भरविण्यात येणार आहे,त्यामध्ये मनपाचा इतिहास, सुरुवातीची परिस्थिती, आताची परिस्थिती तसेच पुढे झेप घेताना महापालिकेच्या पुढची आव्हाने, याची माहिती असणार आहे.या दशकपूर्ती कार्यक्रमात सर्व नागरिकांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले गेले.

## कर्जतचे व्यावसायिक गंगोत्री ते गोमूख जाताना दरीत पडून बेपत्ता

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतमधील एक व्यावसायिक रामकुमार हनुमान गुप्ता हे आपल्या नातेवाईकांच्या समवेत गंगोत्री ते गोमूख असा प्रवास करताना त्यांचा पाय घसरून ते खोल दरीत पडले व बेपत्ता झाले. ही घटना त्यांचा मुलगा, भाचा व नातेवाईकांसमोर घडली. त्यांचे शोधकार्य सुरु आहे परंतु खराब हवामान व बर्फवृष्टी मुळे शोधकार्यात अडथळे येत आहेत.

२५ डिसेंबर रोजी रामकुमार गुप्ता, त्यांचा मुलगा सुमित गुप्ता, भाचा दीपक गुप्ता, शिवसेवक गुप्ता आणि एक जवळचे नातेवाईक गंगोत्री – गोमूख येथे देव दर्शनासाठी जात असता कच्चीढांग जवळ रामकुमार गुप्ता यांचा पाय घासरला आणि ते खोल दरीत पडले. ही घटना त्यांचा मुलगा, भाचा व अन्य नातेवाईकां समोर घडली. तेथे खराब हवामान व बर्फवृष्टीमुळे शोधकार्य करण्यास अडचण येत असल्याने रामकुमार गुप्ता यांचा शोध लागला नाही.

पान १ वरुन

## तीनही निवडणूक आयुक्तांच्या स्पष्टोक्तीमुळे राहुल गांधींचा फेक नॅरेटिव्ह उद्ध्वस्त

निवडणूक आयोगाबाबत काँग्रेसची भूमिका सातत्यपूर्ण आहे का, हाही प्रश्न उपस्थित होतो. तेलंगणा, पंजाब, हिमाचल प्रदेश आणि कर्नाटकसारख्या राज्यांमध्ये काँग्रेसला विजय मिळाला तेव्हा याच निवडणूक व्यवस्थेवर प्रश्न उपस्थित केले गेले नाहीत, मात्र भाजपला विजय मिळाल्यानंतर निवडणूक आयोगावरच प्रश्नचिन्ह निर्माण केले जाते. विजय आणि पराभवाच्या आधारावर संवैधानिक संस्थांचे मूल्यमापन करणे योग्य नाही. ईव्हीएमबाबतही सातत्याने आरोप करण्यात आले. ईव्हीएमसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने आपली भूमिका स्पष्ट केली आहे तसेच निवडणूक आयोगाने ईव्हीएमच्या सुरक्षिततेबाबत आव्हान दिले होते. त्यामुळे आता ईव्हीएमचा मुद्दा बाजूला ठेवून निवडणूक आयोगालाच लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे दिसून येते. 'वोटचोरी'चे आरोप करणाऱ्यांनी प्रथम आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. जनतेने एखाद्या पक्षाला नाकारल्यानंतर त्या पराभवाचे खापर निवडणूक आयोगावर फोडण्याऐवजी जनतेचे प्रश्न घेऊन पुन्हा जनतेमध्ये जाणे हा लोकशाहीचा मार्ग आहे. मतदारांचा कौल स्वीकारणे ही प्रत्येक राजकीय पक्षाची जबाबदारी आहे, असेही त्यांनी अधोरेखित केले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी पुढे म्हटले की, पश्चिम बंगालमधील ज्या १५ मतदारसंघांमध्ये एसआयआर प्रक्रियेदरम्यान मोठ्या प्रमाणात मतदारसंख्या कमी झाल्याचा दावा केला जात आहे, त्या मतदारसंघांतील निवडणूक निकालांचाही वस्तुनिष्ठ विचार होणे आवश्यक आहे. जर वगळण्यात आलेले मतदार मोठ्या प्रमाणात टीएमसीचेच होते, असा दावा केला जात असेल, तर त्या मतदारसंघांमध्ये टीएमसी कशी विजयी झाली, हा प्रश्नही विचारला पाहिजे. त्यामुळे संपूर्ण चित्राचा वस्तुनिष्ठ अभ्यास न करता एकतर्फी आरोप करणे योग्य नाही. मतदार याद्या अधिक अचूक करण्यासाठी नियमित पुनरावलोकनाची प्रक्रिया आवश्यक आहे. विशेषतः शहरी भागामध्ये मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होत असल्याने मतदारांच्या नोंदी अद्ययावत ठेवण्याचे आव्हान निर्माण होते. अनेक नागरिकांचे नाव मूळ गावात तसेच ते वास्तव्यास असलेल्या शहरात असण्याची शक्यता असते. त्यामुळे मतदार याद्यांचे शुद्धिकरण ही सातत्याने चालणारी प्रक्रिया असली पाहिजे. महाराष्ट्रातही ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी भागामध्ये स्थलांतरामुळे मतदार यादीशी संबंधित प्रश्न अधिक प्रमाणात निर्माण होतात. या प्रक्रियेत सर्व राजकीय पक्षांना सहभागी होण्याची संधी आहे. ज्या पद्धतीने आम्ही आमचे बीएलओ तयार करून मतदार याद्यांच्या प्रक्रियेत काम करीत आहोत, त्याचप्रमाणे प्रत्येक राजकीय पक्षाने आपल्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून प्रत्यक्ष पडताळणीमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले.

मतदार याद्यांच्या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण करण्याऐवजी त्या अधिक अचूक आणि पारदर्शक करण्यासाठी राजकीय पक्षांनी सहकार्य करणे गरजेचे आहे. संवैधानिक संस्थांवर सातत्याने आरोप करून जनतेमध्ये अविश्वास निर्माण करण्यापेक्षा उपलब्ध कायदेशीर प्रक्रियेचा वापर करणे अधिक महत्त्वाचे आहे. भारताचे संविधान आणि संविधानाने निर्माण केलेल्या संवैधानिक संस्था या लोकशाही व्यवस्थेचे आधारस्तंभ आहेत. राजकीय मतभेद असू शकतात, मात्र या संस्थांवरील जनतेचा विश्वास आबाधित ठेवणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. निवडणूक प्रक्रियेबाबत निर्माण करण्यात येणारा संभ्रम तथ्यांच्या आधारे दूर केला जाईल आणि संवैधानिक संस्थांना बदनाम करण्याचे कोणतेही प्रयत्न जनतेसमोर टिकणार नाहीत, असा विश्वासही यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केला.

## महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी नगरसेवक परेश ठाकूर यांची बिनविरोध निवड

बॅडमिंटन ऑर्गनायझेशन ऑफ रायगडचे माजी अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर हे २०१४ साली महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी निवडून आलेले रायगड जिल्ह्याचे शेवटचे प्रतिनिधी होते. त्यानंतर तब्बल १२ वर्षांच्या कालावधीनंतर परेश ठाकूर यांच्या निवडीमुळे रायगड जिल्ह्याला पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या बॅडमिंटन प्रशासनाच्या सर्वोच्च नेतृत्वात प्रतिनिधित्व मिळाले आहे.

या अभिमानास्पद नियुक्तीबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील तसेच सभागृहनेते अ‍ॅड. प्रकाश बिनेदार यांच्यासह क्रीडा क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी नवनियुक्त उपाध्यक्ष परेश ठाकूर यांचे अभिनंदन करून पुढील यशस्वी वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. यावेळी बॅडमिंटन ऑर्गनायझेशन ऑफ रायगडचे ज्येष्ठ उपाध्यक्ष रवींद्र भगत, उपाध्यक्ष शिवकुमार कराईल, सहसचिव प्रशांत मुखर्जी, खजिनदार नरेंद्र जोशी, माजी नगरसेविका नीता माळी आदी उपस्थित होते.

बॅडमिंटन ऑर्गनायझेशन ऑफ रायगड (बीओआर)चे अध्यक्ष म्हणून कार्यरत असताना परेश ठाकूर यांनी रायगड जिल्ह्यात बॅडमिंटनच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली बीओआरने खेळाडूंना आर्थिक मदत, होतकरू बॅडमिंटनपटूंना प्रोत्साहन व प्रायोजकत्व, विविध स्पर्धांचे आयोजन तसेच भरीव पारितोषिकांची व्यवस्था करून खेळाडूंना उच्चस्तरीय बॅडमिंटनमध्ये सहभागी होण्यासाठी अधिकाधिक संधी आणि प्रोत्साहन उपलब्ध करून दिले आहे. त्यांच्या या प्रयत्नांमुळे रायगड जिल्हा बॅडमिंटनमधील गुणवंत खेळाडूंचे एक महत्त्वाचे केंद्र म्हणून पुढे येत असून यामधून प्रतिभावंत खेळाडू तयार झाले आहेत. त्याच अनुषंगाने सध्या मास्टर देव रुपरेलिया याची कैरो, इजिप्त येथे होणाऱ्या व्हिक्टर बीडब्ल्यूएफ वर्ल्ड ज्युनिअर टीम चॅम्पियनशिप २०२६साठी भारतीय संघात निवड झाली आहे, तर गाथा सूर्यवंशी हिने चीन येथे झालेल्या आशियाई बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलींच्या एकेरीमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले आहे तसेच राज्यस्तरावरही रायगडने आपली भक्कम उपस्थिती नोंदवली असून रायगडच्या १७ वर्षांखालील आणि १९ वर्षांखालील मुलींच्या संघांनी महाराष्ट्राचे विद्यमान विजेतेपद कायम राखले आहे.

क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी आणि युवा खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी परेश ठाकूर सातत्याने कार्यरत असतात. खेळाडूंना आवश्यक सुविधा, योग्य व्यासपीठ आणि प्रोत्साहन मिळावे यासाठी ते विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतात. तरुणांमध्ये क्रीडा संस्कृती रुजावी, त्यांच्या गुणवत्तेला वाव मिळावा आणि परिसरातील खेळाडूंना आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करण्यासाठी संधी मिळावी यासाठी त्यांचा सातत्यपूर्ण प्रयत्न राहिला आहे. खेळाडूंच्या पाठीशी उभे राहणे, क्रीडा क्षेत्राला चालना देणे आणि नव्या पिढीला खेळाकडे वळवणे हीच परेश ठाकूर यांच्या कार्याची दिशा आहे. त्यामुळे परेश ठाकूर यांच्या महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनमधील नव्या जबाबदारीमुळे महाराष्ट्र तसेच रायगड जिल्ह्यात बॅडमिंटनच्या विकासाला आणखी चालना मिळणार आहे.

## 'जेवढे प्रत्यक्ष काम, तेवढेच देयक'

यावेळी महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर, स्थायी समिती सभापती बबन मुकादम उपस्थित होते.

पनवेल महापालिका क्षेत्रात गणेशमूर्तींच्या विसर्जनासाठी यंदा ७७ कृत्रिम आणि २९ नैसर्गिक अशा एकूण १०६ विसर्जन स्थळांची व्यवस्था करण्यात आली होती. गणेशभक्तांची मोठी गर्दी लक्षात घेऊन विसर्जन प्रक्रिया सुरक्षित, शिस्तबद्ध आणि सुरळीत पार पडावी यासाठी पालिकेने विविध उपाययोजना केल्या होत्या. यामध्ये कृत्रिम तलावांची उभारणी करण्याबरोबरच बॅरिकेडिंग, वीज व्यवस्था, प्रकाशयोजना, सीसीटीव्ही, वैद्यकीय सुविधा, निर्माल्य संकलन, सुरक्षा व्यवस्था, मनुष्यबळ, वाहतूक नियोजन तसेच अन्य आवश्यक सुविधांचा समावेश होता.

**घोटाळा सिद्ध झालेला नाही, मग आरोप कशाच्या आधारे?**

कोणत्याही आर्थिक गैरव्यवहाराचा निष्कर्ष काढण्यासाठी प्रत्यक्ष कामाची तपासणी, मोजमाप, कागदपत्रांची पडताळणी आणि देयक प्रक्रियेची तपासणी आवश्यक असते. ही प्रक्रिया अद्याप सुरू असताना संपूर्ण व्यवस्थेला 'घोटाळा' किंवा 'भ्रष्टाचार' असे संबोधणे घाईचे ठरेल. अंतिम तपासणी आणि मूल्यांकनानंतरच प्रत्यक्ष किती खर्च झाला आणि किती देयक अदा करायचे हे निश्चित होणार आहे. पालिकेने गणेशोत्सवाच्या काळात नागरिकांना उपलब्ध करून दिलेल्या सुविधांवरही प्रकाश टाकला आहे. शहरातील विविध भागांमध्ये कृत्रिम विसर्जन तलाव उपलब्ध करून दिल्यामुळे नागरिकांना आपल्या परिसरातच गणेशमूर्तींचे विसर्जन करता आले. सुविधांच्या दृष्टीनेही विविध उपाययोजना करण्यात आल्याने गणेशभक्तांना मोठा फायदा झाला.

**नागरिकांची दिशाभूल करण्याचा आरोप**

दरम्यान, महापालिकेच्या विविध कामांबाबत अपूर्ण माहितीच्या आधारे आरोप करून नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण केला जात असल्याचा आरोप पालिकेच्या भूमिकेतून करण्यात आला आहे. मालमत्ता करासह विविध नागरी प्रश्नांवरून यापूर्वीही नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण करणारी वक्तव्ये झाल्याचा दावा करण्यात आला. मालमत्ता कर हा महापालिकेच्या उत्पन्नाचा महत्त्वाचा स्रोत असून त्यातून शहरातील पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, आरोग्य, प्रकाशयोजना आणि इतर नागरी सुविधांसाठी निधी उपलब्ध होतो. त्यामुळे करासंदर्भात नागरिकांना योग्य माहिती देणे आवश्यक असताना केवळ राजकीय भूमिकेतून नागरिकांना कर न भरण्याचे आवाहन करणे योग्य आहे का, असा सवालही अ‍ॅड. प्रकाश बिनेदार यांच्याकडून उपस्थित करण्यात आला.

**मग स्वतः मालमत्ता कर का भरला? 'जिझिया कर' उल्लेखावरूनही टीका**

मालमत्ता करासंदर्भातील वक्तव्यांमध्ये 'जिझिया कर' या शब्दाचा वापर केल्याबद्दलही पालिकेच्या भूमिकेतून लीना गरड यांच्यावर टीका करण्यात आली आहे. ऐतिहासिकदृष्ट्या जिझिया हा काही इस्लामी राजवटींमध्ये मुस्लिमेतर प्रजेवर आकारला जाणारा कर होता. त्यामुळे आधुनिक स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालमत्ता कराची तुलना अशा ऐतिहासिक कराशी करणे योग्य आहे का, असा सवाल उपस्थित करण्यात आला आहे. जनतेला चुकीची माहिती देऊन संभ्रम निर्माण करणे हा नगरसेविका लीना गरड यांचा कायम चालत आलेला फंडा आहे. मालमत्ता कराच्या बाबतीतही त्यांनी लोकांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा कुटील डाव केला होता. मालमत्ता करावर महापालिकेचा विकास अवलंबून असतो हे त्यांना माहीत नसेल म्हणूनच नेहमीच कर भरू नका, असे लोकांना सांगत सुटतात. मग स्वतः मालमत्ता कर का भरला याचे उत्तर आहे का लीना गरड यांच्याकडे, असा सवालही यावेळी त्यांनी उपस्थित केला. तसेच मालमत्ता कराच्या बाबतीत जनतेला भडकवून देणे शोभत नाही, असा टोलाही लगावला. जिझिया कराचा उच्चार त्या आपल्या वाक्यात करत असतात विशेष म्हणजे या कराची पूर्ण माहिती त्यांना नसेल, म्हणूनच त्यांच्या तोंडी याच कराचा उल्लेख होतो. याच्यावरून त्यांच्या मानसिकतेचे दर्शन होत आहे. प्रत्येक वेळी स्वतःच्या स्वार्थापोटी नागरिकांची दिशाभूल करण्याचे काम त्या करत आल्या आहेत. त्याचा प्रत्यय गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना पुन्हा एकदा आला, असा टोलाही शेवटी अ‍ॅड. बिनेदार यांनी लगावला.

# अखंड वीजपुरवठ्यामुळे उद्योगांना चालना मिळेल -आमदार प्रशांत ठाकूर

## कामोठ्यात औद्योगिक एक्स्प्रेस फिडरच्या कामाचे भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जवाहर को-ऑप. इंडस्ट्रियल इस्टेटमधील उद्योगांना अखंड वीजपुरवठा मिळावा यासाठी औद्योगिक एक्स्प्रेस फिडरच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले. या फिडरमुळे येथील सुमारे ११२ कारखान्यांना २४ तास अखंडित वीजपुरवठा उपलब्ध होऊन उद्योगधंद्यांना मोठी चालना मिळेल, असा विश्वास आमदार प्रशांत ठाकूर यांनी यावेळी व्यक्त केला.




कामोठे येथील जवाहर को-ऑप. इंडस्ट्रियल इस्टेट लिमिटेडच्या सोसायटी कार्यालयात हा कार्यक्रम झाला. यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, जिल्हाधिकारी किशन जावळे, महापौर नितीन पाटील, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटये, उपायुक्त उद्योग व सेवा जी. एस. हरळया, महावितरणचे अधीक्षक अभियंता दीपक पाटील, जवाहर को-ऑप. इंडस्ट्रियल इस्टेटचे अध्यक्ष स्वप्नील गुप्ते, कार्याध्यक्ष केतन नाईक, उपाध्यक्ष आशिष बलदोटा यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, जवाहर इंडस्ट्रियल इस्टेटमध्ये सुमारे ११२ कारखाने कार्यरत आहेत. भूमिगत पद्धतीने अखंड वीजपुरवठा उपलब्ध झाल्याने कारखानदारांना मोठा फायदा होणार असून उत्पादन प्रक्रियेत येणारे वीजपुरवठ्याशी संबंधित अडथळे कमी होण्यास मदत होईल. त्यामुळे परिसरातील उद्योगवाढीलाही चालना मिळेल. या प्रकल्पासाठी दिवंगत प्रदीप गुप्ते यांनी अनेक वर्षे प्रयत्न केले होते. त्यानंतर विद्यमान अध्यक्ष स्वप्नील गुप्ते यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळून प्रकल्पासाठी १०० टक्के शासकीय निधी उपलब्ध झाला असून आता प्रत्यक्ष कामाला सुरुवात होत असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले. अध्यक्ष स्वप्नील गुप्ते यांनी प्रास्ताविकात या प्रकल्पासाठी केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त केले तसेच जवाहर इंडस्ट्रियल इस्टेट परिसरातील रस्ते आणि अन्य मूलभूत सुविधा पनवेल महानगरपालिकेने उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी केली.

कार्यक्रमास उद्योजक विजय लोखंडे, नगरसेवक विकास घरत, प्रदीप घरत, कामोठे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्योती देशमुख, गुन्हे शाखा कक्ष-३चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील, पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी यांच्यासह संचालक मंडळातील गिरीश देशपांडे, बी. पी. तेरडे, उदित सं. कपूर, सिद्धेश ना. सावंत, तरुण सु. आहुजा, रोहिणी डॉंगरे, नंदन सुदाम पाटील-हंडे, नेहा वि. शर्मा, प्रदीप शाह, रोजी म. कपूर, सरकारी प्रतिनिधी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पनवेल, व्यवस्थापक आर. एस. निकम तसेच सरकारी प्रतिनिधी तथा महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, अलिबाग यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश गाडगीळ यांनी केले.

# कर्मवीरांच्या त्यागाची आठवण कायम ठेवावी -लोकनेते रामशेठ ठाकूर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेमध्ये शिकल्यानंतर या संस्थेचा सार्थ अभिमान आपल्याला वाटला पाहिजे. विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात उत्तुंग यश तर प्राप्त करावेच, पण त्याचबरोबर संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या त्यागाची आठवण कायम ठेवावी, असे प्रतिपादन संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कामोठे येथे केले.

कामोठे येथील रयत शिक्षण संस्थेच्या लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेज तसेच लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या संयुक्त विद्यमाने पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३९वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. स्वतःच्या वैयक्तिक आयुष्याचा कोणताही विचार न करता गरीब आणि शिक्षणापासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांसाठी कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेची उभारणी केली. या कार्यक्रमात विविध मान्यवरांनी कर्मवीरांच्या जीवनकार्याचा आढावा घेणारी भाषणे केली.

आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, रयत शिक्षण संस्था ही लाखो पालकांसाठी एक आधार आहे. संस्थेचे ब्रीदवाक्य सातत्याने पुढे नेले पाहिजे आणि यादृष्टीने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर अविरत कार्य करत असल्याचे सांगितले, तर प्रमुख पाहुणे डॉ. राजेश येवले यांनी विद्यार्थ्यांनी कर्मवीरांचा ध्यास आणि इतिहास डोळ्यांसमोर ठेवून शिक्षणाची परंपरा अखंडित पुढे चालवावी, असे आवाहन केले. या सोहळ्यात शिष्यवृत्ती परीक्षेत उत्कृष्ट यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा विशेष पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला.

दहावी व बारावीच्या परीक्षांमध्ये प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या व विषयनिहाय गुणवत्ता सिद्ध करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना रोख रकमांची पारितोषिके देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर, जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, रायगड विभागाचे विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे, प्रभाग समिती सभापती रवींद्र जोशी, नगरसेवक विकास घरत, प्रदीप भगत, हेमलता गोवारी, शीलाताई भगत, भाऊ भगत, समाजसेवक रवींद्र म्हात्रे, यशवंत उलवेकर, बाळासाहेब कारंडे, विनोद खेडेकर, आशा भगत, प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे, मुख्याध्यापक अविनाश कुलकर्णी यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

# कळंबोलीत कचरा वर्गीकरण अभियान

## स्वच्छ, सुंदर परिसराचा नारा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

घराघरातून निघणारा ओला आणि सुका कचरा वेगवेगळा ठेवून स्वच्छ पनवेल, सुंदर पनवेल करण्यासाठी पनवेल महापालिकेने शासन आपल्या दारी अभियान सुरू केले आहे. महापालिका क्षेत्रातील गृहनिर्माण संस्थांमध्ये महापालिकेचे स्वच्छतागृही सोमवारी कळंबोलीतील गुरुविला हाउसिंग सोसायटीमध्ये दाखल झाले होते. त्यांनी प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून ओला व सुका कचरा कसा ठेवावा, त्यासाठी कोणती काळजी घ्यावी यासाठी एक आगळेवेगळे अभियान राबविले.



यावेळी पनवेल महापालिकेच्या स्वच्छ पनवेल, सुंदर पनवेलच्या अभियानाला नागरिकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पनवेल महानगरपालिकेच्या वतीने महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरण बदल विभागाच्या माध्यमातून स्वच्छ भारत अभियान संकल्पनेतून घनकचरा व्यवस्थापन कसे करावे यासाठी कळंबोलीतील गुरुविला हाउसिंग सोसायटीमध्ये सोमवारी ओला कचरा, सुका कचरा वर्गीकरणाबाबत माहितीपर जनसंवाद साधण्यात आला. यावेळी गुरुविला सोसायटीचे पदाधिकारी गहीनाथ धुमाळ, अशोक वाघमोडे, दीपक घोसाळकर तसेच गृहिणी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

स्वच्छता महोत्सव २०२६च्या माध्यमातून महापालिका क्षेत्रातील प्रत्येक घरामध्ये कचरा वर्ग करण्याची सवय कशा पद्धतीने लावावी, घरांमध्ये आढळणाऱ्या चार प्रकारच्या कचऱ्याचे व्यवस्थापन करून तो वेगळा कसा करायचा, ओला कचरा, सुका कचरा कशा प्रकारे वेगळा करून त्याची विशेष काळजी घ्यावी, स्वच्छतेमध्ये आढळणारा सॅनिटरी कचरा, ई-कचरा यांची विल्हेवाट कशी लावावी याची माहिती देण्यात आली.

माझे घर स्वच्छ तरच माझे पनवेल स्वच्छ, असा नारा यावेळी उपस्थितांना देण्यात आला व आपले पनवेल शहर सुंदर, स्वच्छ, नीटनेटके कसे राहील यासाठी पनवेल शहर स्वच्छ करण्यास सहभागी होण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले. स्वच्छता हीच सेवा असून त्याचे महत्त्वही विशद करण्यात आले. महापालिकेच्या या आगळ्यावेगळ्या उपक्रमाला नागरिकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# गव्हाण विद्यालयाची योगासन स्पर्धेत बाजी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पाले बुद्रुक येथील पुष्प निकेतन इंग्लिश मीडियम स्कूल येथे रविवारी (दि. २७) संपन्न झालेल्या शासकीय तालुकास्तरीय योगासन स्पर्धेत रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण-कोपर येथील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करीत विद्यालयाच्या यशाची परंपरा कायम राखली. पनवेल तालुक्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग घेतला होता.




## ११ पारितोषिकांची लयलूट

या चुरशीच्या स्पर्धेत गव्हाण विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करीत एकूण ११ पारितोषिकांची लयलूट केली. तालुकास्तरीय स्पर्धेत वैयक्तिक ट्रॅडिशनल योगासने, वैयक्तिक आर्टिस्टिक योगासने आणि आर्टिस्टिक पेअर योगासने अशा तीन प्रमुख प्रकारांमध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या योगकौशल्याचे दर्शन घडविले. विविध वयोगटांत गव्हाण विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्रथम व द्वितीय क्रमांक मिळवत पनवेल तालुक्यात विद्यालयाचे नाव उज्ज्वल केले. १४ वर्षांखालील वयोगटात आर्टिस्टिक बॉईज प्रकारात पूर्वेश नायडूने प्रथम क्रमांक पटकावला. आर्टिस्टिक पेअर गर्ल्स प्रकारात काव्या पाटील व हर्षिता जोगी यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. १७ वर्षांखालील वयोगटात आर्टिस्टिक बॉईज प्रकारात परवेज खानने द्वितीय क्रमांक, तर ट्रॅडिशनल बॉईज प्रकारात प्रथम क्रमांक मिळविला.

आर्टिस्टिक पेअर बॉईज प्रकारात श्रेयस पाटील व अजिंक्य पाटील यांनी प्रथम क्रमांक पटकावत उल्लेखनीय कामगिरी केली. १९ वर्षांखालील वयोगटात ट्रॅडिशनल गर्ल्स तसेच आर्टिस्टिक गर्ल्स या दोन्ही प्रकारांत दिव्या केंद्रेने प्रथम क्रमांक मिळविला. आर्टिस्टिक गर्ल्स पेअर प्रकारात दिव्या केंद्रे व दीक्षा म्हात्रे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. ट्रॅडिशनल बॉईज प्रकारात अभिजित जाधवने प्रथम, तर आदित्य कुराडेने द्वितीय क्रमांक मिळविला. आर्टिस्टिक प्लेयर बॉईज प्रकारात भाविक कोळी व आदित्य कुराडे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. विद्यार्थ्यांच्या दमदार कामगिरीमुळे गव्हाण विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. विजेत्या खेळाडूंसोबत उपस्थित राहून त्यांना प्रोत्साहन देणाऱ्या डी. पी. माळी यांचेही विशेष कौतुक करण्यात आले.

या यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत व जिद्दीसोबतच क्रीडा शिक्षक सुरेश पारखे यांच्या नियोजनबद्ध मार्गदर्शनाचा मोलाचा वाटा राहिला. या घवघवीत यशाबद्दल विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, उपप्राचार्य लेंभे, पर्यवेक्षिका पाटील, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य आर. एस. भोईर, लाइफ वर्कर डी. के. म्हात्रे तसेच क्रीडा शिक्षक सुरेश पारखे आणि सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन केले. आगामी जिल्हास्तरीय व इतर स्पर्धांसाठी सर्व यशस्वी खेळाडूंना शुभेच्छा देण्यात आल्या.

## निवडक

### सोन्याच्या दागिन्यांची चोरी

**नवीन पनवेल** : कपाटात ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांची चोरी केल्याप्रकरणी तीन संशयित महिलांविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात २७ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनिता कोल्हे सेक्टर ५ इ येथे राहत असून त्यांनी त्यांच्या राहत्या घरातील लोखंडी कपाटात काही दागिने ठेवले होते. त्यावेळी घराची चावी शेजारील महिलांकडे दिली होती. त्या घरी आल्या असता त्यांना सोन्याच्या अंगठ्या, कानातील झुमके आणि रिंग सापडून आले नाहीत. त्यांनी याप्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. दरम्यान, सणावाराच्या दिवसांमध्ये घडणाऱ्या चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलीसही आता अधिक सतर्क झाले आहेत.

### लग्नाचे प्रलोभन दाखवून अत्याचार

**नवीन पनवेल** : लग्नाचे प्रलोभन दाखवून अत्याचार केल्याप्रकरणी आरोपी अनिकेत दत्तात्रय कांबळे याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात २७ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फेब्रुवारी २०२४ ते सप्टेंबर २०२६ दरम्यान पनवेल येथील हॉटेलमध्ये नेऊन आरोपीने पीडितेला लग्नाचे प्रलोभन दाखवले आणि तिच्यासोबत अत्याचार केला. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

### मोबदल्याच्या आमिषाने फसवणूक

**नवीन पनवेल** : कंपन्यांच्या स्टॉकमध्ये गुंतवणूक केल्यास आपल्याला त्याबद्दल चांगला मोबदला देण्याचे आमिष दाखवून ५४ वर्षीय इसमाची २३ लाख ६६ हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात २७ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बापू धोंडू गवळी हे अरिहंत अरहम, कोप्रोली येथे राहत असून त्यांना अनोळखी इसमाने व्हॉट्सअपद्वारे संपर्क साधला आणि विविध कंपन्यांच्या स्टॉकमध्ये आपण मोठी गुंतवणूक केल्यास त्याचा चांगला मोबदला मिळेल असे आमिष दाखवले. दरम्यान, ९ ते १८ सप्टेंबरदरम्यान अनोळखी इसमाने सांगितल्याप्रमाणे विविध बँक खात्यांवर २३ लाख ६६ हजार रुपये रक्कम घेऊन त्यांना कोणताही मोबदला दिला नाही आणि त्यांची फसवणूक केली. पोलीस याप्रकरणी अधिक तपास करीत आहेत.

# पळस्पे येथे भीषण अग्निकांड

## व्यावसायिक गाळे भस्मसात

**पनवेल : वार्ताहर**

जेएनपीटी-पळस्पे महामार्गावरील साई वर्ल्ड सिटी इमारतीजवळील व्यावसायिक गाळ्यांच्या रांगेत रविवारी रात्री पावणेआठच्या सुमारास अचानक भीषण आग लागली. काही क्षणातच आगीने रौद्ररूप धारण केल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली. या आगीत काही व्यावसायिक गाळे जळून खाक झाले असून व्यापाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

प्राथमिक माहितीनुसार एका गाळ्यात अचानक आग लागली. त्यानंतर आगीने लगतच्या गाळ्यांनाही कवेत घेतले. आगीच्या प्रचंड ज्वाळा आणि धुराचे लोट दूरवरून दिसत असल्याने महामार्गावरील प्रवासी तसेच स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या तीन ते चार गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. अग्निशमन दलाच्या जवानांनी आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. रविवार असल्याने बहुतांश दुकाने बंद होती. त्यामुळे सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

दरम्यान, आग नेमकी कशामुळे लागली याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. शॉर्टसर्किटमुळे आग लागली की अन्य कारणामुळे याचा तपास पोलीस आणि अग्निशमन दलाकडून करण्यात येत आहे. आगीमुळे झालेल्या नुकसानीचा नेमका अंदाज तपासानंतरच स्पष्ट होणार आहे.

# महिलेस लुटणाऱ्या आरोपीला अटक

**नवीन पनवेल : वार्ताहर**

चहाच्या टपरीवरील महिलेला चाकूचा धाक दाखवून तिच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र, अंगठी, मोबाइल आणि रोख रक्कम घेऊन लुटणाऱ्या चौघांपैकी एका आरोपीला गुन्हे शाखा कक्ष ३ने अटक केली. यातील आणखी तिघांचा शोध सुरू आहे. २४ सप्टेंबरला दुपारच्या सुमारास चार आरोपींनी बारवई येथील मीना कातकरी यांना चाकूचा धाक दाखवला आणि त्यांच्याकडील सोन्याचा ऐवज लुटून नेला. गुन्हा दाखल झाल्यानंतर गुन्हे शाखा कक्षाने समांतर तपास केला. वपोनि औदुंबर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांच्या पथकाने चोरी केलेल्या मोबाइलच्या तांत्रिक विश्लेषणावरून इंदापूर पोलीस ठाणे यांच्या मदतीने मंगेश देसाई काळे उर्फ राहुल कांता राज पवार उर्फ मंजू याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून गुन्ह्यातील मोबाइल, चाकू, दोन लोखंडी कोयते, काळ्या रंगाची बॅग हस्तगत करण्यात आली आहे.

# कळंबोलीत पाणीमीटर चोरट्यांचा धुमाकूळ

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली वसाहतीतील सेक्टर ४, ५ आणि ६ परिसरात पाणीमीटर चोरीच्या घटनांनी नागरिक त्रस्त झाले आहेत. या भागातून आतापर्यंत सुमारे ६० ते ७० पाणीमीटर चोरीला गेल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे चोरट्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

मध्यरात्रीपासून पहाटेपर्यंत काही व्यक्ती गोणपाट घेऊन परिसरात फिरत असून पाणीमीटर चोरी करीत असल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये कैद झाले आहे. चोरीच्या घटनांमागे एकच टोळी कार्यरत आहे का, याचा तपास करण्याची मागणी होत आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात आविष्कार संशोधनावर मार्गदर्शन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रामशेठ ठाकूर महाविद्यालय, खारघर येथे सोमवारी (दि. २८) सकाळी ११ वाजता संशोधन संस्कृतीला चालना देण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड निर्माण करण्याच्या उद्देशाने महाविद्यालयाच्या रिसर्च ॲडव्हायझरी कमिटीतर्फे विद्यार्थ्यांसाठी आविष्कार संशोधन अधिवेशन या विषयावर विशेष अभिमुखता व मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

सदर उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना संशोधनाची संकल्पना, संशोधन पद्धती, योग्य संशोधन विषयाची निवड, संशोधनाची प्राथमिक प्रक्रिया तसेच आविष्कार संशोधन अधिवेशनात सहभागी होण्याची प्रक्रिया याबाबत सविस्तर मार्गदर्शन करणे हा होता. विद्यार्थ्यांनी संशोधन विषयाची निवड करताना कोणत्या बाबींचा विचार करावा, संशोधन प्रश्न कसा निश्चित करावा आणि संशोधनाच्या माध्यमातून समाजोपयोगी व नावीन्यपूर्ण कल्पना कशा मांडता येतात याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुण्या हन्नत शेख यांनी विद्यार्थ्यांना माहितीपूर्ण व मार्गदर्शनपर व्याख्यान दिले. त्यांनी संशोधनाची मूलभूत तत्त्वे, संशोधन विषयाची निवड, संशोधनाची उद्दिष्टे निश्चित करणे, संशोधन पद्धतीचा योग्य वापर तसेच आविष्कार संशोधन अधिवेशनासाठी प्रकल्प सादरीकरणाची प्रक्रिया याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी संशोधनाकडे केवळ शैक्षणिक उपक्रम म्हणून न पाहता समस्या सोडविण्याचे आणि नवकल्पनांना वाव देणारे प्रभावी माध्यम म्हणून पाहावे, असे त्यांनी स्पष्ट केले.

मार्गदर्शन सत्राला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून संशोधन विषय, प्रकल्पाची आखणी, आविष्कारमधील सहभाग आणि सादरीकरण यासंदर्भात आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. सत्रामुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाविषयी उत्सुकता निर्माण होऊन भविष्यात संशोधन प्रकल्पांमध्ये सहभागी होण्यासाठी त्यांना प्रेरणा मिळाली. या यशस्वी उपक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या महेश्वरी झिरपे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. त्यांनी संशोधनविषयक उपक्रमांना सातत्याने प्रोत्साहन व सहकार्य दिल्याबद्दल तसेच विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची संस्कृती रुजविण्यासाठी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल रिसर्च ॲडव्हायझरी कमिटीतर्फे कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रिसर्च ॲडव्हायझरी कमिटीच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले तसेच दुसऱ्या सत्रामध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन व आभार व्यक्त करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना संशोधनाची दिशा, वैज्ञानिक दृष्टिकोन, नवकल्पना आणि आविष्कार संशोधन अधिवेशनातील सहभागाची प्रक्रिया याबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन मिळाले असून महाविद्यालयातील संशोधनाभिमुख वातावरण अधिक बळकट होण्यास निश्चितच मदत होणार आहे.

## संपादकीय

# भारत भूमिकेवर ठाम

दहशतवादाविषयी शून्य सहनशीलता आणि भारताच्या सार्वभौमत्वाच्या रक्षणासाठी सुयोग्य प्रत्युत्तर हीच मोदी सरकारच्या सुरक्षा धोरणाची सातत्यपूर्ण दिशा आहे. सर्जिकल स्ट्राइकला दहा वर्षे पूर्ण होत असताना भारताचा हाच स्पष्ट संदेश आहे.

**दहा वर्षांपूर्वी २८-२९ सप्टेंबर २०१६ रोजी भारतीय लष्कराने नियंत्रण रेषा ओलांडून पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर केलेल्या सर्जिकल स्ट्राइकने भारताच्या दहशतवादविरोधी धोरणाला निर्णायक वळण दिले. उरीतील दहशतवादी हल्ल्यानंतरची ही कारवाई हे केवळ लष्करी प्रत्युत्तर नव्हते. भारत आता दहशतवाद सहन करून गप्प बसणारा देश राहिलेला नाही हा स्पष्ट संदेश या कारवाईतून जगाला देण्यात आला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्जिकल स्ट्राइकच्या दहाव्या वर्धापनदिनाच्या पूर्वसंध्येला रविवारी आपल्या 'मन की बात'मध्ये या ऐतिहासिक कारवाईचे स्मरण केले. सर्जिकल स्ट्राइकने भारताच्या दहशतवादविरोधी धोरणाचे नवे उदाहरण जगासमोर ठेवले. त्यानंतर बालाकोट हवाई कारवाईपासून ऑपरेशन सिंदूरपर्यंत भारताने एकच स्पष्ट संदेश सातत्याने दिला. दहशतवाद्यांनी आपली वाईट नजर भारताकडे वळवल्यास त्यांना त्याच भाषेत योग्य प्रत्युत्तर दिले जाईल हा तो संदेश. आज भारत दहशतवादाविरोधात शून्य सहनशीलतेचे धोरण अवलंबत आहे आणि त्याचे परिणाम आपण पाहतो आहोत असे पंतप्रधानांनी रविवारी आपल्या 'मन की बात'मध्ये देखील स्पष्ट केले. या धोरणातील सातत्य महत्त्वाचे आहे. पूर्वी देशातील दहशतवादी हल्ल्यांनंतर निषेध, पुरावे आणि आंतरराष्ट्रीय दबावासाठीचे प्रयत्न एवढ्यापुरतीच भारताची कारवाई मर्यादित राहते अशी धारणा होती. मोदी सरकारच्या काळात मात्र यासंदर्भातील भारताची भूमिका अधिक ठाम व चोख प्रत्युत्तराची झाली. दहशतवाद्यांना आणि त्यांना आश्रय देणाऱ्यांना भारताच्या सुरक्षेची किंमत मोजून मोकळे रान मिळणार नाही हे प्रत्यक्ष कृतीतून दाखवण्यात आले. याच भूमिकेचे प्रतिबिंब अलीकडच्या संयुक्त राष्ट्रांच्या महासभेतही दिसले. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी पाकिस्तानला 'दहशतवादाचा सातत्याने अवलंब करणारा देश' असे संबोधले. दहशतवादाचे सामान्यीकरण करण्याचे आणि त्याच्या परिणामांपासून सूट मिळवण्याचे प्रयत्न स्वीकारले जाणार नाहीत असे त्यांनी ठणकावून सांगितले. दहशतवादाविरुद्ध स्वतःचे रक्षण करण्याचा भारताचा अधिकार वापरला जाईल. मैत्री, सद्भावना आणि सामान्य संबंध दहशतवादासोबत एकाच वेळी अस्तित्वात असू शकत नाहीत असे जयशंकर यांनी स्पष्ट केले. दहशतवादाला प्रोत्साहन देणाऱ्या सरकारांना जबाबदार धरले पाहिजे आणि दहशतवादाच्या अर्थपुरवठ्यालाही आळा घातला पाहिजे अशी भारताची भूमिका त्यांनी मांडली. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी महासभेत काश्मीर आणि सिंधू जलकराराचा मुद्दा उपस्थित केला. मात्र दहशतवाद आणि मैत्रीपूर्ण संबंध एकत्र चालू शकत नाहीत ही आपली भूमिका भारताने स्पष्ट शब्दांत सुनावली. हा केवळ पाकिस्तानला दिलेला संदेश नसून दहशतवादाविरोधातील भारताची ही भूमिका आंतरराष्ट्रीय व्यासपीठावरही स्पष्ट आणि सातत्यपूर्ण राहिली आहे. दरम्यान, शांघाय सहकार्य संघटनेच्या (शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशन अर्थात एससीओ) राष्ट्रीय समन्वयकांची पहिली बैठक २८ ते ३० सप्टेंबरदरम्यान पाकिस्तानच्या अध्यक्षतेखाली इस्लामाबादमध्ये होत आहे. एससीओ सदस्य देशांचे राष्ट्रीय समन्वयक या बैठकीत सहभागी होत असून पाकिस्तानच्या अध्यक्षतेखालील कार्यक्रमाचे वेळापत्रक, आगामी बैठका आणि संघटनेच्या कामकाजाची रूपरेषा यावर चर्चा होणार आहे. पुढील वर्षी एससीओ राष्ट्रप्रमुखांची परिषद पाकिस्तान आयोजित करणार आहे. अद्याप परिषदेला बराच अवकाश असला तरी पंतप्रधान मोदी या परिषदेसाठी पाकिस्तानात जाणार का, असा प्रश्न सध्या चर्चिला जात आहे.**

# बळीराजाच्या मदतीसाठी शासन थेट बांधावर!



शेतकऱ्याच्या शेतात उभे असलेले पीक म्हणजे केवळ शेतीतील उत्पादन नसते; त्यामागे संपूर्ण कुटुंबाची स्वप्ने, मुलांच्या शिक्षणाची आशा, घरखर्चाची तरतूद आणि वर्षभराच्या कष्टाचे फळ दडलेले असते. त्यामुळे पावसाने दडी मारली, जमिनीतील ओलावा कमी झाला आणि डोळ्यांसमोर उभे असलेले पीक करपू लागले की त्याची झळ केवळ शेतापुरती मर्यादित राहत नाही. ती संपूर्ण कुटुंबाच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनावर परिणाम करते. महाराष्ट्रातील काही भागांमध्ये निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या अडचणींचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांचा दौरा केला. शेतांमध्ये जाऊन त्यांनी पिकांची पाहणी केली, शेतकरी आणि ग्रामस्थांशी संवाद साधला आणि त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

राज्यातील सध्याच्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी केवळ प्रशासकीय अहवाल आणि आकडेवारी पुरेशी नसते. शेताच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष परिस्थिती समजून घेणे, शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकणे आणि स्थानिक पातळीवरील अडचणी जाणून घेणे तितकेच महत्त्वाचे ठरते. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दौऱ्यात पिकांची स्थिती, पाण्याची उपलब्धता आणि शेतकऱ्यांसमोरील अडचणी यांचा प्रत्यक्ष आढावा घेण्यात आला. विशेषतः धाराशिव जिल्ह्यातील पाहणीदरम्यान शेतकऱ्यांच्या परिस्थितीची माहिती घेतल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी दुष्काळी परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी राज्य शासनाची भूमिका स्पष्ट केली. दुष्काळाचा सामना करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना राबविण्यात येतील आणि त्यासाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही, अशी स्पष्ट ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. संकटाच्या काळात मदतीसाठी निधीची अडचण निर्माण होऊ नये आणि आवश्यक उपाययोजना वेळेत करता याव्यात, यासाठी शासनस्तरावर आवश्यक निर्णय घेतले जातील, असे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्याच्या वर्षभराच्या कष्टाचे अंतिम फलित पीक असते. तेच पीक संकटात सापडले, तर त्याचा थेट परिणाम त्याच्या उत्पन्नावर होतो. त्यामुळे पीक नुकसानीबाबत शेतकऱ्यांना सरसकट मदत देण्यात येईल, अशी महत्त्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली आहे. पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीचा आधार मिळावा, यासाठी आवश्यक प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. दुष्काळाच्या परिस्थितीत पिकांइतकाच महत्त्वाचा प्रश्न आहे तो पिण्याच्या पाण्याचा. त्यामुळे पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी या दौऱ्यादरम्यान स्पष्ट केले. त्याचबरोबर जनावरांसाठी चारा आणि पाण्याची व्यवस्था करण्यासोबतच शेतकरी आणि शेतमजूर कुटुंबांसाठी अन्नधान्याची व्यवस्था केली जाणार आहे. दुष्काळाची झळ केवळ शेतीला बसत नाही, तर त्याचा परिणाम कुटुंबाच्या रोजच्या गरजांवरही होतो. त्यामुळे पाणी, चारा आणि अन्नधान्य या मूलभूत गरजांचा एकत्रित विचार करून उपाययोजना करणे आवश्यक आहे. मदत जाहीर झाल्यानंतर ती प्रत्यक्ष लाभार्थ्यापर्यंत पोहोचणे तितकेच महत्त्वाचे असते.

यादृष्टीने शेतकऱ्यांना थेट मदत त्यांच्या खात्यात जमा करण्यात येईल आणि शासन त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहील, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी दिला आहे. संकटाच्या काळात आर्थिक मदत थेट शेतकऱ्यापर्यंत पोहोचल्याने त्याला तातडीच्या गरजा भागविण्यासाठी आधार मिळू शकतो. उपलब्ध पाणीसाठ्यांचा योग्य वापर आणि भविष्यातील पाणी-चारा गरजांचे नियोजन करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या नुकसानीची दखल घेताना पीक विमा, आपत्ती निवारणाच्या तरतुदी आणि शासनाच्या विविध योजनांमधून उपलब्ध होणाऱ्या मदतीचाही विचार केला जात आहे. बाधित भागातील वस्तुस्थिती, पिकांचे नुकसान आणि स्थानिक परिस्थितीचा आढावा घेऊन पुढील मदतीबाबत निर्णय घेतले जात आहेत. अशा वेळी शेतकऱ्यांना उपलब्ध असलेली मदत वेळेत मिळणे आणि त्यासाठीची प्रशासकीय प्रक्रिया सुलभ राहणे महत्त्वाचे ठरते.या संकटाच्या काळात शेतकऱ्यांशी थेट संवाद साधण्यालाही विशेष महत्त्व आहे. करपलेली पिके, कोरडी पडलेली शेतजमीन, पाण्याची चिंता आणि पुढील हंगामाचे नियोजन या सगळ्याचा परिणाम शेतकरी कुटुंबावर होत असतो. त्यामुळे शेतकऱ्यांचे म्हणणे प्रत्यक्ष ऐकून घेणे आणि त्यानुसार प्रशासनाला आवश्यक सूचना देणे हा संकट व्यवस्थापनातील महत्त्वाचा भाग ठरतो.

मुख्यमंत्र्यांचा लातूर, धाराशिव आणि सोलापूर दौरा याच दृष्टीने महत्त्वाचा ठरतो. दरम्यान, राज्यातील इतर भागांतील परिस्थितीचाही शासनस्तरावर आढावा घेतला जात आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुलडाणा जिल्ह्यातील खामगाव तालुक्यातील कलोरी तसेच मोताळा तालुक्यातील खडकी, खामखेड, रोहिनखेड व टाकळी येथे आणि अकोला जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यातील धधम व व्याळा या गावांना भेट देऊन पाहणी केली आणि बळीराजाला धीर दिला. तसेच उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनीही शेतकऱ्यांच्या अडचणींबाबत संवेदनशीलता व्यक्त करत बाधित भागांतील परिस्थिती जाणून घेण्यावर भर दिला आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेतीसमोर पावसाच्या अनिश्चिततेचे मोठे आव्हान उभे आहे. अशा वेळी शेतकऱ्याच्या नुकसानीची वस्तुनिष्ठ नोंद, वेळेवर मदत, पाणी आणि चाऱ्याचे नियोजन तसेच पुढील हंगामासाठी आवश्यक आधारव्यवस्था या बाबी महत्त्वाच्या ठरतात. राज्य शासन आणि प्रशासनाच्या उपाययोजनांचा केंद्रबिंदू शेतकरी आणि त्याचे कुटुंब राहणे आवश्यक आहे. बळीराजाच्या बांधावर पोहोचून परिस्थिती समजून घेणे म्हणजे केवळ पाहणी नव्हे, तर प्रत्यक्ष वास्तव निर्णयप्रक्रियेपर्यंत पोहोचवण्याची प्रक्रिया आहे. आज शेतकरी ज्या परिस्थितीतून जात आहे, त्याची तीव्रता लक्षात घेऊन मदतीची अंमलबजावणी वेळेत आणि प्रभावीपणे होणे गरजेचे आहे.

त्यासाठी शासनाच्या निर्णयांसोबतच प्रशासनाची प्रभावी अंमलबजावणी आणि स्थानिक पातळीवरील समन्वयही तितकाच महत्त्वाचा आहे.शेतकऱ्याच्या कष्टाचे आणि नुकसानीचे योग्य मूल्यमापन करून त्याला उपलब्ध असलेल्या मदतीचा लाभ वेळेत मिळणे, हीच या संपूर्ण प्रक्रियेची खरी कसोटी ठरणार आहे. पीक नुकसानीसाठी सरसकट मदत, पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य, जनावरांसाठी चारा, शेतकरी आणि शेतमजूर कुटुंबांसाठी अन्नधान्याची व्यवस्था तसेच थेट खात्यात जमा होणारी मदत या माध्यमातून संकटाच्या काळात शेतकरी कुटुंबाला आधार देण्याचा हा प्रयत्न आहे. बळीराजाच्या शेतात पुन्हा हिरवाई यावी, त्याच्या कुटुंबाला आर्थिक स्थैर्य मिळावे आणि पुढील हंगामासाठी त्याचा विश्वास कायम राहावा, यासाठी तातडीच्या उपाययोजनांसोबतच पुढील काळाचे नियोजनही आवश्यक आहे.

आजच्या परिस्थितीत शासन, प्रशासन आणि स्थानिक यंत्रणा यांच्यातील समन्वय महत्त्वपूर्ण ठरणार आहे. बळीराजा संकटात असताना घेतलेले निर्णय आणि तो शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याचा वेग, या दोन्ही गोष्टी महत्त्वाच्या असतात.महाराष्ट्राचा शेतकरी संकटांना न घाबरता पुन्हा उभा राहण्याची ताकद ठेवतो. त्याला गरज आहे ती योग्य वेळी मिळणाऱ्या आधाराची. बळीराजाच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य यावे, त्याच्या शेतात पुन्हा हिरवाई नांदावी, त्याच्या कुटुंबाच्या डोळ्यांत पुन्हा सुखी भविष्याची स्वप्ने दिसावीत आणि त्याच्या कष्टाला योग्य आधार मिळावा, यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्नशील आहे.

शेतकरी महाराष्ट्राचा अन्नदाता आहे. संकटात त्याच्या पाठीशी उभे राहणे व त्याला उभारी देणे शासनाची जबाबदारी आहे. आज बळीराजाच्या बांधावर पोहचलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्याला एकच विश्वास देत आहेत, संकट कितीही मोठे असो, महाराष्ट्राचा शेतकरी एकटा नाही. राज्य शासन त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे.

**-वर्षा फडके-आंधळे,**
**उपसंचालक (वृत्त)**




# शेती आता होणार स्मार्ट! बळीराजाला एआयची साथ

भारतीय कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी एव्ही पॉलिमर्स लिमिटेडने एक मोठे पाऊल उचलले आहे. कंपनीने आपली उपकंपनी एव्ही इको स्पार्क प्रायव्हेट लिमिटेडच्या माध्यमातून 'कृषीबडी' हे कृत्रिम बुद्धिमत्तेवर अर्थात एआय आधारित स्मार्ट फार्मिंग प्लॅटफॉर्म लाँच केल्याची घोषणा केली आहे. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना आता शेतीविषयक निर्णय घेणे सोपे होणार असून त्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होणार आहे.



'कृषीबडी' हा एक प्रगत शेती सहाय्यक आहे. जो विशेषतः भारतातील लहान शेतकऱ्यांच्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आला आहे. याची काही प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

**बहुभाषिक AI इंटरफेस :** शेतकरी आता त्यांच्या स्वतःच्या प्रादेशिक भाषेत आवाज, मजकूर किंवा फोटोंच्या माध्यमातून शेतीविषयक माहिती मिळवू शकतील. यामुळे तंत्रज्ञानातील भाषेचा अडथळा दूर झाला आहे.

**सॅटेलाइट क्रॉप मॉनिटरिंग :** उपग्रहाद्वारे पिकांचे रिअल-टाइम निरीक्षण केले जाईल, ज्यामुळे पिकांचे आरोग्य आणि शेतातील परिस्थितीची अचूक माहिती मिळेल.

**नफा कॅल्क्युलेटर :** थेट बाजारभाव आणि शेतीसाठी झालेला खर्च यांचा विचार करून शेतकरी आपल्या संभाव्य नफ्याचा अंदाज लावू शकतील.

**कीड आणि रोग नियंत्रण :** स्थानिक हवामान आणि डेटाच्या आधारे पिकांवरील रोग किंवा किडीबद्दल शेतकऱ्यांना आधीच अलर्ट (सूचना) दिले जातील.

**हायटेक शेतीवर भर :** या प्लॅटफॉर्मद्वारे सॅटेलाइट आधारित पीक देखरेख, बाजारभावावर आधारित नफा कॅल्क्युलेटर आणि पिकांवरील रोग व कीड नियंत्रणासाठी आगाऊ सूचना दिल्या जातील. यामुळे शेतकऱ्यांना अचूक निर्णय घेणे सोपे होईल.

**जागतिक बाजारपेठेची दारे उघडणार**

केवळ माहितीच नव्हे, तर कृषीबडी ॲप शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठेशी जोडण्याचे कामही करणार आहे. निर्यात नियोजनासारख्या वैशिष्ट्यांमुळे शेतकरी आणि शेतकरी उत्पादक संस्थांना त्यांचे उत्पादन आंतरराष्ट्रीय स्तरावर विकण्याची संधी मिळणार आहे.

# थोर समाजसुधारक हमीद दलवाई

हमीद उमर दलवाई हे समाजसुधारक व मराठी साहित्यिक होते. एक साहसी, तत्त्वनिष्ठ आणि आधुनिक विचारांचे प्रतीक होते. त्यांनी मुस्लिम समाजातील रूढीवादी मानसिकतेला आव्हान देत, स्त्री-पुरुष समानता, शिक्षण आणि धर्मनिरपेक्षतेसाठी अखंड संघर्ष केला. मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेतून त्यांनी आधुनिकतेचा नवा अध्याय लिहिला.

त्यांचा जन्म मिरजोळी, तालुका चिपळूण येथे २९ सप्टेंबर १९३२ रोजी झाला. दलवाई यांचे माध्यमिक शिक्षण चिपळूणमध्ये तर पुढील शिक्षण मुंबईत रुपारेल व इस्माईल युसुफ या महाविद्यालयांत झाले. हमीद यांनी महात्मा जोतिराव फुले याच्या प्रभावामुळे संघटनेची स्थापना केली.

मुस्लिम समाजसुधारणेच्या उद्देशाने त्यांनी इ.स. १९७० मध्ये मुस्लिम सत्यशोधक मंडळ स्थापले. मुस्लिम समाजाच्या शिक्षणाचा व भाषा माध्यमाचा प्रश्न, मुसलमानांचे मराठी साहित्य, मुस्लिम समाजात आधुनिक विचार प्रसाराचे प्रयत्न अशा अनेक प्रश्नांवर हे सत्यशोधक मंडळ काम करत आले आहे. हमीद दलवाई यांनी इ.स. १९६६ मध्ये सात मुसलमान महिला घेऊन मुंबईतील कौन्सिल हॉलवर मोर्चा काढला. मुसलमानांमधील तोंडी तलाक,



## निमित्त


बहुपत्नीत्व आदींमुळे त्यांच्यामधील स्त्रियांची होणारी घुसमट सरकारसमोर आणावी हा या मोर्चाचा हेतू होता. मुसलमान स्त्रियांचा हा बहुधा पहिलाच मोर्चा असावा. महंमद पैगंबरांचे जीवन, तसेच कुराण-हदीस यांबद्दल मोकळी, सविस्तर चर्चा मुस्लिम समाजात व्हावी, अशी त्यांची इच्छा होती. अशा चर्चेमुळे मुस्लिम समाजातील साचलेपणा दूर व्हावा, आचार-विचारात उदारता यावी, तसेच प्रबोधनाचे प्रवाह सुरू व्हावेत यासाठी हमीद दलवाईंनी आपले आयुष्य वेचले.

त्यांच्या शेवटच्या आजारातही त्यांनी स्वस्थ न बसता 'राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान' नावाचे पुस्तक लिहिले. हे लेखन प्रामुख्याने भारतीय मुसलमानांच्या धार्मिक प्रवृत्ती, राजकारण, त्यांचे राजकीय नेतृत्व, पाकिस्तानची चळवळ आणि उद्दिष्टे, हिंदुत्ववाद या विषयांवर आहे.

त्यातील तपशील, तपशिलांमागील अर्थ, उद्याच्या भारतासाठी बदलाची गरज यांसंबंधीचे पुस्तकातील विवेचन वाचल्यावर हमीद दलवाईंच्या प्रबोधनविषयक दृष्टीची कल्पना यावी. समाजप्रबोधनाचे काम करणाऱ्या कोणाही दृष्ट्या नेत्याला होतो, त्यापेक्षा कितीतरी जास्त विरोध दलवाईंना झाला.हमीद दलवाई हे रॅशनल भूमिका घेणारे कृतीशील विचारवंत होते. राष्ट्रीय एकात्मता हे अंतिम उद्दिष्ट मानणारे,मुस्लिम समाजातील सुधारणांना बळ देण्यासाठी निर्भीडपणे अनेक प्रबोधन-कृती कार्यक्रम राबविणारे सामाजिक क्रांतीरिक हमीद दलवाई यांनी मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या माध्यमातून वैचारिक लढा उभारला.

धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही ही दोन मूल्ये दलवाईंच्या विचारांच्या केंद्रस्थानी होती. परंपरावादाला नकार आणि ऐहिकतेचा स्वीकार यांचा पुरस्कार करणाऱ्या या मेकर्स ऑफ मॉडर्न इंडियात त्यांना मानाचे स्थान आहे. ३ मे १९७७ रोजी त्यांचे निधन झाले. हमीद दलवाई यांना अमेरिकेतील महाराष्ट्र फाऊंडेशनने २०१७ सालच्या जानेवारीमध्ये जीवनगौरव पुरस्कार दिला. (साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



# आरोग्य प्रहर

## रात्री असे कपडे परिधान करा, चांगली झोप येईल

रात्री शांत आणि गाढ झोप येणे हे खूप महत्त्वाचे असते. झोप जर शांत नसेल तर तुम्हाला दुसऱ्या दिवशी अस्वस्थ वाटू लागते. त्याचे कारण अनेकदा तुम्ही परिधान केलेले कपडेही असतात. त्यामुळे तुम्ही अनकम्फर्टेबल होतात. या विषयी डॉ. पयोज पांडे यांनी कारणे सांगितली आहेत. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे रात्री झोपताना तुम्ही कोणत्या प्रकारचे कपडे परिधान करतात त्यावर सगळे अवलंबून असते.



**मऊ आणि ब्रीदेबल कपडे परिधान करा**

रात्री झोपताना मऊ आणि ब्रीदेबल कॉटन, लिनन सारखे कपडे परिधान करा. हे कपडे ब्रीदेबल असतात. यामुळे तुम्हाला गरम होत नाही.

**सैल कपडे परिधान करा**

झोपताना सैल कपडे परिधान करा चुकूनही टाईट कपडे परिधान करू नका. त्याचे कारण म्हणजे ब्लड फ्लो थांबू शकते. नाईट गाऊन, पायजामा आणि टी-शर्ट परिधान केले.

**वातावरणानुसार कपडे निवडा**

वातावरण जसे असेल त्यानुसार कपडे निवडा. उन्हाळ्यात हलक्या रंगाचे आणि तुमचे शरीर थंड ठेवतील असे कपडे परिधान करा. हिवाळ्यात गरम कपडे परिधान करा आणि त्यासोबत ते ब्रीदेबल आहेत ना याचीही काळजी घ्या.

**सिंथेटिक कपडा**

सिंथेटिक कपडे जसे नायलॉन किंवा पॉलिस्टर झोपण्यासाठी योग्य नाही. ते अंगाला चिटकून राहतात. त्यामुळे सततच्या येणाऱ्या घामामुळे ॲलर्जी होण्याची शक्यता आहे. त्यासोबत हे कपडे शरीरातील उष्णता बाहेर पडू देण्यापासून अडवतात.

**कमीत कमी आणि साधी डिझाइन**

लेस, रिबन किंवा बटन असलेले याशिवाय डिझाइन असलेले कपडे झोपताना घालू नका त्यामुळे तुम्ही अस्वस्थ होऊ शकतात. साधे आणि कमीत कमी डिझाइन असलेले कपडे परिधान करा.

**रात्री परिधान करणारे कपडे स्वच्छ आणि फ्रेश असावेत**

रात्री झोपताना तुम्ही जे कपडे परिधान करणार आहेत ते स्वच्छ असायला हवे. ते घामटलेले किंवा धूळ लागली नसेल याची काळजी घ्याल. त्यामुळे बॅक्टेरिया आणि फंगलचं संक्रमण होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे देखील झोपेत अडथळे येऊ शकतात. त्यामुळे रोज रात्री झोपायच्या आधी स्वच्छ कपडे परिधान करा.

# राजिपतर्फे आशा स्वयंसेविकांचा सन्मान

## आयुष्मान भारत कार्ड निर्मितीचे १०० टक्के उद्दिष्ट केले पूर्ण



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाच्यावतीने नुकताच २०२६-२७मध्ये आयुष्मान भारत कार्ड निर्मितीचे १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या ५० आशा स्वयंसेविकाचा सन्मान राजिप उपाध्यक्ष तथा आरोग्य सभापती मधुकर पाटील यांच्या हस्ते प्रमाणपत्र देउन करण्यात आला. त्याचप्रमाणे विविध पुरस्कारप्राप्त आरोग्य केंद्रांचाही सन्मान करण्यात आला.

यावेळी उपाध्यक्ष मधुकर पाटील यांनी मार्गदर्शन करताना, आरोग्य विभागाने सातत्याने सतर्क राहून काम करावे. त्याचप्रमाणे प्रत्येक नागरिकापर्यंत आरोग्यसेवेचा लाभ देण्यासाठी प्रयत्न करावा. जिल्ह्यात उत्कृष्ट कार्य केलेल्या डॉक्टरांचाही सन्मान केला जाईल, असे त्यांनी सांगितले.राजिप आरोग्य समितीची सभा नुकतीच उपाध्यक्ष तथा आरोग्य सभापती मधुकर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या सभेसाठी जि. प. सदस्य उषा ठोंबरे, सदस्य नेहा पारंगे, सदस्य शर्मिला बोडके, सदस्य ॲड. अविनाश ठाकूर, सदस्य दिशा जाधव, सदस्य मन्सूर ताज, खालापूर पंचायत समिती सभापती कृष्णा पारंगे, मुरूड पंचायत समिती सभापती निलेश घटवळ, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दयानंद सुर्यवंशी, सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. जयेश गोसावी यांच्यासह इतर अधिकारी, कर्मचारी, पुरस्कारप्राप्त आरोग्य केंद्रांचे प्रतिनिधी, आशास्वयंसेविका उपस्थित होते.

या सभेत जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दयानंद सुर्यवंशी यांनी 'तिशीचा पल्ला.. तपासणी अन् सल्ला' या अभियानाची सविस्तर माहिती दिली. त्याचप्रमाणे श्रीगणेशा आरोग्याचा अभियानाबाबत आढावा घेण्यात आला. यानंतर रायगड जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात आपल्या सेवाकाळात अत्यंत निष्ठा व प्रामाणिकपणे काम केल्याबद्दल तीन सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचाही गौरव यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकनामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र चिखली राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल राज्यात प्रथम, उपकेंद्र खंडाळे (प्रा.आ. केंद्र पोयनाड) राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल, उपकेंद्र धामणी (प्रा.आ. केंद्र नेरे) राज्य स्तरावर उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल, उपकेंद्र देवळी (प्रा.आ. केंद्र गोरेगाव) राज्य स्तरावर उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल गौरविण्यात आले.

# जिल्ह्यात आज रोजगार महाकुंभ मेळाव्याचे आयोजन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रोजगार महाकुंभ-महाराष्ट्र अंतर्गत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड-अलिबाग कार्यालयामार्फत जिल्ह्यात १२ ठिकाणी "रोजगार महाकुंभ-महाराष्ट्र"चे आयोजन करण्यात येत असून याकरिता जिल्ह्यातील जास्तीत जास्त नोकरी इच्छुक उमेदवारांनी नोंदणी करुन रोजगार मेळाव्याच्या ठिकाणी मुलाखतीकरिता उपस्थित रहावे.

सेवा संकल्प अभियान (१७ सप्टेंबर,२०२६ ते १७ ऑक्टोबर,२०२६) अंतर्गत दि. २९ सप्टेंबर, २०२६ रोजी कोकण व नाशिक विभागात एकाच दिवशी, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत एकाच वेळी ४००+ ठिकाणी रोजगार मेळावे/प्लेसमेंट ड्राईव्ह आयोजित केले जाणार आहेत.

राज्यातील युवकांना त्यांच्या परिसरातच रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे, हा या उपक्रमांचा मूळ गाभा असून हा उपक्रम राज्यातील जिल्हा, तालुका व औद्योगिक परिसरांमध्ये राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने दि.२९ सप्टेंबर, २०२६ रोजी होणाऱ्या "रोजगार महाकुंभ महाराष्ट्र" अंतर्गत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड-अलिबाग कार्यालयामार्फत रायगड जिल्ह्यामध्ये १२ ठिकाणी "रोजगार महाकुंभाचे आयोजन करण्यात येत असून जिल्ह्यात १४९ कंपनी आस्थापनांनी नोंदणी केली आहे.

जिल्ह्यातील युवकांना त्यांच्या परिसरातच रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे, हा या उपक्रमांचा मूळ गाभा असून हा उपक्रम राज्यातील जिल्हा, तालुका व औद्योगिक परिसरांमध्ये राबविण्यात येत आहे.

रोजगार महाकुंभ-महाराष्ट्र रायगड जिल्ह्यातील १२ ठिकाणे पुढीलप्रमाणे आहेत. अंजुमन आय इस्लाम काळसेकर टेक्निकल कॅम्पस, प्लॉट नं.२&३, सेक्टर १६, ठाणा नाका जवळ, खांदागाव नवीन पनवेल. डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे, ता.माणगाव. आयटीएम कौशल्य विद्यापीठ, प्लॉट नंबर २५&२६, औद्योगिक क्षेत्र सेक्टर-४, खारघर, ता.पनवेल. शेठ जे.एन.पालीवाला कला, वाणिज्य, कला आणि विज्ञान महाविद्यालय पाली-सुधागड. यादवराव तासगावकर तंत्रनिकेतन महाविद्यालय डॉ.एन.वाय.तासगावकर कॉम्प्लेक्स चंधाई पो.नरसापुर ता.कर्जत. भारतीय एज्युकेशन सोशल/चॅरिटेबल ट्रस्ट मु.वेलशेत, पो.पिगोंडे, ता.रोहा. के.टी.एस.पीएम.बि.एल.पाटील तंत्रनिकेतन महाविद्यालय सेमिनार हॉल २ रा माळा, बि.एल.पाटील तंत्रनिकेतन महाविद्यालय, खोपोली. एम.जी.एम. इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्स ३ रा माळा, एम.जी.एम. एज्युकेशन कॅम्पस, प्लॉट नं. १&२ सेक्टर ०१, कामोठे नवी मुंबई.डॉ.पतंगराव कदम, कला आणि वाणिज्य महाविद्यालय सिव्हिल कोर्ट जवळ पेण. जे. एस. एम. महाविद्यालय महर्षी कर्वे रोड, एसबीआय बँकेच्या मागे, लिमयेवाडी अलिबाग. रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ ३ रा माळा, हसमुख भवन सिडकोच्या मागे, हिरानंदानी पार्कजवळ, सेक्टर ०४, खारघर पनवेल. श्रीमती गीता डि तटकरे तंत्रनिकेतन महाविद्यालय मु.गोवे, पो.कोलाड, ता.रोहा.

# रेवस-रेड्डी सागरी महामार्गाकरिता संपादन होणाऱ्या क्षेत्राचा मोबदला देण्याचे काम सुरू

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रेवस रेड्डी सागरी महामार्गाकरिता संपादन होणाऱ्या क्षेत्राचे मोबदला देण्याचे काम उपविभागीय अधिकारी कार्यालय अलिबाग येथे सुरु असून मिळकती मध्ये ज्या व्यक्तींचा हितसंबंध असल्यास त्यांना कोणत्याही प्रकारची हरकत उपस्थित करावयाची असल्यास उपविभागीय अधिकारी अलिबाग यांच्या कार्यालयात आवश्यक त्या पुराव्यांसह हरकत दाखल कराव्यात असे आवाहन उपविभागीय अधिकारी अलिबाग मुकेश चव्हाण यांनी केल आहे.

महाराष्ट्र महामार्ग अधिनियम १९५५ चे कलम १९ (ब) नुसार खालील गावातील बाधित खातेदारांना भूसंपादन मोबदला स्विकारण्याबाबत नोटीस या कार्यालया मार्फत दि.२ सप्टेंबर २०२६ रोजी बजाविण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने मौजे चौल ता.अलिबाग व मौजे



सावली व टोकेखार ता.मुरुड येथील खातेदारांमार्फत भूसंपादन मोबदला स्वीकारण्याकामी संमती पत्र/करार पत्र प्राप्त सादर केलेली आहेत. उपविभागीय अधिकारी अलिबाग यांच्या कार्यालयात प्राप्त संमती पत्रामधील खातेदारांना भूसंपादन मोबदला वाटपाची कार्यवाही सुरू आहे.

मौजे चौल, ता.अलिबाग व मौजे सावली, टोकेखार, ता.मुरुड येथील खातेदारांनी नोटीसीत नमूद केल्याप्रमाणे मिळकतीचा मोबदला स्विकारणेकामी जिल्हास्तरीय समितीने मंजूरी दिलेला दर मान्य असल्यास संबंधितांनी आपले संमतीपत्र उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांच्या कार्यालयात मुदत संपण्यापूर्वी म्हणजेच दि.१ ऑक्टोबर २०२६पर्यंत कार्यालयीन वेळेत समक्ष उपस्थित राहून सादर करावे, असे उपविभागीय अधिकारी अलिबाग मुकेश चव्हाण यांनी कळविले आहे.


**पनवेल महानगरपालिका**
तालुक - पनवेल, जिल्हा - रायगड ४१०२०६
**पशुवैद्यकीय विभाग**
॥ जाहीर आवाहन ॥
**"जागतिक रेबीज दिन- २०२६" निमित्त पाळीव व भटक्या श्वानांसाठी मोफत रेबीज प्रतिबंधात्मक लसीकरण मोहीम**

रेबीज या प्राणघातक आजाराचे पूर्णपणे निर्मूलन करण्यासाठी आणि सार्वजनिक आरोग्याच्या उपायांना बळकट करण्यासाठी दरवर्षी २८ सप्टेंबर हा "जागतिक रेबीज दिन" म्हणून साजरा केला जातो. वर्ष २०२६ साठी " Stronger Together" (एकत्र येऊन अधिक मजबूत) ही अधिकृत संकल्पना निश्चित करण्यात आली आहे. या संकल्पनेअंतर्गत पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात पशुवैद्यकीय फिरत्या दवाखान्यांद्वारे दिनांक २८ सप्टेंबर २०२६ ते ०३ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत पाळीव व परिसरातील भटक्या श्वानांसाठी मोफत रेबीज प्रतिबंधात्मक लसीकरण शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

**लसीकरण शिबिरांचे सविस्तर वेळापत्रक :**

| दिनांक | वेळ | ठिकाण | ठिकाण |
|---|---|---|---|
| २८.०९.२०२६ | १०.३० ते ६.०० | पोलीस हेडकॉटर, कळंबोली. | गावदेवी मंदीर जवळ, देवीचा पाडा. |
| २९.०९.२०२६ | १०.३० ते ६.०० | DAV स्कुल जवळ, न्यू पनवेल. | छत्रपती शिवाजी विद्यालय, रोहिंजण. |
| ३०.०९.२०२६ | १०.३० ते ६.०० | सिडको ऑफिसच्या बाजुला, कामोठे. | प्रशांत कॉर्नरजवळ, सेक्टर ३५ खारघर. |
| ०१.१०.२०२६ | १०.३० ते ६.०० | महात्मा स्कुलच्या जवळ, खांदा कॉलनी | उत्सव चौक, खारघर. |
| ०२.१०.२०२६ | १०.३० ते ६.०० | वडाळे तलाव, पनवेल. | शिल्प चौक, खारघर. |
| ०३.१०.२०२६ | १०.३० ते ६.०० | पांजरपोळ, टपाल नाका, पनवेल. | फुड वे हॉटेल जवळ, सेक्टर २०, तळोजा फेज २. |

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व नागरिकांना तसेच प्राणीप्रेमींना जाहीर आवाहन करण्यात येते की, त्यांनी आपल्या पाळीव श्वानांना व परिसरातील भटक्या श्वानांना या फिरत्या लसीकरण केंद्रांवर आणून मोफत रेबीज प्रतिबंधात्मक लस देऊन सहकार्य करावे आणि पनवेल महानगरपालिकेस 'रेबीजमुक्त' बनवण्याच्या या मोहिमेत सहभागी व्हावे.

दिनांक : २८/०९/२०२६
जा.क्र.: पमपा/जनसंपर्क/३१२६/प्र.क्र./३१२/३३४/२०२६

**सही/-**
**उपायुक्त**
पनवेल महानगरपालिका



सिडको
शहरांचे शिल्पकार

## नोटीस-१

साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण "ना हरकत पत्र" मागणी अर्जानुसार नोटीस १) श्री. विजय गणपतराव बुक्कावार, राहणार- ९०२, ए-विंग, सावोज रहेजा गार्डन, एलबीएस रोड, ठाणे-४०० ६०४, २) श्री. सचिन आनंद मुकेवार, राहणार- भूखंड क्र. एम-२१, निवारा तात्या टोपे नगर, डब्लुएचसी रोड, विवेकानंद नगर, नागपूर, महाराष्ट्र-४४० ०१५ ३) श्री. अमिताभ बद्रीनारायण शर्मा, राहणार- फ्लॅट नं ७०१, भूखंड क्र. १८७, तुलीप अपार्टमेंट, शिवाजी नगर, नागपूर महाराष्ट्र- ४४० ०१० (अर्जदार).

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखीत २२.५% योजनेअंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे १) सोनाली महेंद्र घरत ऊर्फ सोनाली मयुरेश चौधरी २) शुभांगी महेंद्र घरत ३) मयुरेश प्रकाश चौधरी ४) प्रित विश्वनाथ म्हात्रे यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता ना हरकत प्रमाणपत्रासाठी मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ट भूखंडाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करारनामा तथा भाडेपट्टा करारनामा नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| ३३०५ | २२/०९/२०२६ | पुष्पक नोड | २६ | ३४५ | १२४०.०० चौ.मी. | ५/६/२०२३ | ६/६/२०२३ |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** यांचे कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसांच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर ''ना हरकत प्रमाणपत्र'' देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**(भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**
**सिडको/जनसंपर्क/२३६/२०२६-२७**



## जाहीर नोटीस

खालील संबंधित ग्राहकांना या नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, आमच्या कापड बाजार शाखेतील खालील तक्त्यामध्ये नमूद केलेल्या लॉकरधारकांनी गेल्या १५ वर्षा पेक्षा जास्त काळ आपले लॉकर हाताळलेले (Operate) नाहीत, तसेच लॉकरचे **भाडे (Rent) थकविले** आहे.

बँकेने संबंधित ग्राहकांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर वेळोवेळी लेखी पत्रे आणि स्मरणपत्रे पाठवूनही त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही.

| लॉकर क्रमांक | लॉकरधारकाचे नाव | नोंदणीकृत पत्ता | थकबाकीची रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| १९ | श्री. नयन आनंद देढीया | सहयोग नगर, जोशी आळी, पनवेल | २१२४०/- |
| २१ | सौ. शालिनी नंदकुमार पालव | यमुना निवास, तक्का पनवेल | २८३२०/- |

त्यामुळे, या नोटीसद्वारे संबंधित लॉकरधारकांना अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांना अंतिम संधी देण्यात येत आहे की, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **१५ दिवसांच्या आत** बँकेशी संपर्क साधावा. तसेच आपली सर्व थकबाकी भरून लॉकर नियमित करून घ्यावा. जर मुदती संपण्यापूर्वी लॉकरधारकांनी संपर्क साधला नाही, तर आरबीआय (RBI) च्या नियमांनुसार बँक कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय **लॉकर तोडण्याची (Break-Open)** कायदेशीर कारवाई करेल. लॉकर तोडताना निघणाऱ्या साहित्याची जबाबदारी पूर्णपणे लॉकरधारकाची असेल, लॉकर तोडताना निघणारे साहित्य / दागिने बँकेच्या सुरक्षित ताब्यात ठेवले जातील किंवा नियमानुसार त्याचा लिलाव केला जाईल आणि या प्रक्रियेचा सर्व खर्च ग्राहकाकडून वसूल केला जाईल.

दिनांक : २८/०९/२०२६
स्थळ : पनवेल

**आदेशावरून,**
**सही/-**
मुख्य कार्यकारी अधिकारी
दि पनवेल को ऑप अर्बन बँक लि.

Ref. No. 62/240/2026-27



## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **श्रीमती मालतीबाई बाळकृष्ण घरत उर्फ मालती बाळकृष्ण घरत** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे : हरिश्चंद्र पिंपळे (५५३३२६)**
(PU-ID : २५८८५२५५६०८), तालुका-उरण, जिल्हा-रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ५/२ खाते क्रमांक : ५५ | १ | १.८९.८० पो.ख. ०.०९.०० **एकुण १.९८.८०** | २५.०० |

वरील क्षेत्रापैकी श्रीमती मालतीबाई बाळकृष्ण घरत उर्फ मालती बाळकृष्ण घरत यांच्या नावे विक्रीस असलेले एकुण क्षेत्र ०.२०.०० गुंठयाचे खरेदीखत

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **२१** दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २९/०९/२०२६

**सही/-**
**ॲड. योगेश नामदेव म्हात्रे**
ॲट. पो. कोप्रोली, तालुका - उरण, जिल्हा - रायगड ४१०२०६
मो. क्र. ८०९७१०८०६०



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की **मौजे भिंगार,** तहसील-पनवेल, जिल्हा-रायगड येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार श्री. भगवान दामा पाटील व इतर यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे :-

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे भिंगार,** तहसील पनवेल, जिल्हा रायगड येथील मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र लावणी लायक हे.आर.प्रती | क्षेत्र पोटखराबा हे.आर.प्रती | क्षेत्र एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| १६५/२ | ०.३२.१० | ०.०१.६० | ०.३३.६० | ६.७५ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन **१५** दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २८/०९/२०२६

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए.एल.एल.बी.

**कार्यालयीन पत्ता :** गाळा क्र. १५४ महानगरपालिका कॉम्प्लेक्स, तहसीलदार ऑफिसजवळ, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६.
संपर्क:- ८८८८२७१७५९



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की **मौजे भिंगार,** तहसील-पनवेल, जिल्हा-रायगड येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार श्रीमती गुलाब गोपाळ भोपी व इतर यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे :-

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे भिंगार,** तहसील पनवेल, जिल्हा रायगड येथील मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र लावणी लायक हे.आर.प्रती | क्षेत्र पोटखराबा हे.आर.प्रती | क्षेत्र एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| ५९/१/२ | ०.२१.०० | ०.००.०० | ०.२१.०० | ४.१८ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन **१५** दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २८/०९/२०२६

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए.एल.एल.बी.

**कार्यालयीन पत्ता :** गाळा क्र. १५४ महानगरपालिका कॉम्प्लेक्स, तहसीलदार ऑफिसजवळ, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६.
संपर्क:- ८८८८२७१७५९



## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **श्री. विनायक रामकृष्ण नाईक व इतर ५** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे : हरिश्चंद्र पिंपळे (५५३३२६)**
(PU-ID : २५८८५२५५६०८), तालुका-उरण, जिल्हा-रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ५/२ खाते क्रमांक : ५५ | १ | १.८९.८० पो.ख. ०.०९.०० **एकुण १.९८.८०** | २५.०० |

वरील क्षेत्रापैकी श्री. विनायक रामकृष्ण नाईक व इतर ५ यांच्या नावे विक्रीस असलेले एकुण क्षेत्र ०.२०.०० गुंठयाचे खरेदीखत

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **२१** दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २९/०९/२०२६

**सही/-**
**ॲड. योगेश नामदेव म्हात्रे**
ॲट. पो. कोप्रोली, तालुका - उरण, जिल्हा - रायगड ४१०२०६
मो. क्र. ८०९७१०८०६०



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की **मौजे देहरंग,** तहसील-पनवेल, जिल्हा-रायगड येथील खाली वर्णन करणेत आलेला बिनशेती भुखंड विद्यमान कब्जेदार श्री. अथर्व सुब्रामानैम, श्री. अनुराग वेंकटेश गोडबोले व श्री.अभिषेक पद्मनाभ गोडबोले यांचेकडून आमचे अशिलांनी कायम खरेदी घेण संबंधी बोलणी सुरू आहेत. महसूल दप्तरी असलेले सदर बिनशेती भुखंडाचे वर्णन खालिलप्रमाणे :-

**बिनशेती भुखंडाचे वर्णन**

**मौजे देहरंग,** तहसील पनवेल, जिल्हा रायगड येथील मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ४/ब/१५ | १ | ४३.५०.०० | ४३५.०० |

वरील बिनशेती भुखंड / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन **७** दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २८/०९/२०२६

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए.एल.एल.बी.

**कार्यालयीन पत्ता :** गाळा क्र. १५४ महानगरपालिका कॉम्प्लेक्स, तहसीलदार ऑफिसजवळ, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६.
संपर्क:- ८८८८२७१७५९

# पराभवाचे खापर निवडणूक आयोगावर फोडणे जनतेचा अवमान

## वनमंत्री गणेश नाईक यांचा राहुल गांधींवर घणाघात

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

काँग्रेस आणि त्यांच्या सहकाऱ्यांकडून निवडणूक आयोगासह संवैधानिक संस्थांबाबत निर्माण केला जात असलेला फेक नॅरेटिव्ह तीनही केंद्रीय निवडणूक आयुक्तांच्या अलीकडील पत्रकार परिषदेमुळे उद्ध्वस्त झाला आहे, असा दावा राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी केला. विशेष सखोल पुनरावलोकनासह निवडणूक प्रक्रियेतील सर्व निर्णय एकमताने झाले असून तीनही निवडणूक आयुक्तांमध्ये कोणतेही मतभेद नसल्याचे स्पष्ट झाले आहे, असेही त्यांनी सांगितले.

राहुल गांधी संविधानाचे पुस्तक हातात घेऊन सातत्याने संवैधानिक संस्थांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करीत आहेत. संविधानाने निर्माण केलेल्या संस्थांवरील जनतेचा विश्वास कमी करण्याचा प्रयत्न ही त्यांची रणनीती असल्याची टीका नाईक यांनी केली. कॅबिनेट सचिवांकडे पाठविण्यात आलेले पत्र कोणत्याही नीतिगत अथवा धोरणात्मक विषयाशी संबंधित नव्हते, तर प्रतिनियुक्तीवरील नियुक्तीशी संबंधित होते. मात्र, या पत्राला वेगळे स्वरूप देऊन निवडणूक आयोगामध्ये मतभेद असल्याचा आभास निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला, असे नाईक म्हणाले. फॉर्म क्रमांक ६च्या संदर्भातही जाणीवपूर्वक संभ्रम निर्माण केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. सर्वोच्च न्यायालयाने ज्या स्वरूपात फॉर्म क्रमांक ६ वैध ठरवला आहे, त्याच स्वरूपात तो वापरला जात आहे. त्यामुळे या मुद्द्यावरून संभ्रम निर्माण करणे म्हणजे सर्वोच्च न्यायालयाच्या



निर्णयाबाबतही जनतेमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न असल्याचे नाईक यांनी सांगितले.

निवडणुकीत विजय मिळाल्यानंतर निवडणूक आयोग योग्य आणि पराभव झाल्यानंतर त्याच आयोगावर आरोप अशी भूमिका काँग्रेसने सोडली पाहिजे, असेही त्यांनी म्हटले. तेलंगणा, पंजाब, हिमाचल प्रदेश आणि कर्नाटकात काँग्रेसला विजय मिळाला, तेव्हा हाच निवडणूक आयोग योग्य होता. मग भाजप विजयी झाल्यानंतर त्याच आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न का उपस्थित केले जातात, असा सवाल नाईक यांनी केला. ईव्हीएमच्या मुद्द्यावरूनही सातत्याने आरोप करण्यात आले. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने ईव्हीएमबाबत निर्णय दिला आहे. तसेच निवडणूक आयोगाने ईव्हीएम हॅक करून दाखविण्याचे आव्हान दिले होते; मात्र ते सिद्ध करण्यासाठी कोणीही पुढे आले नाही. जनतेने नाकारल्यानंतर प्रत्येक पराभवाचे खापर निवडणूक आयोगावर फोडणे जनतेच्या निर्णयाचा अवमान असल्याचेही मंत्री नाईक यांनी सांगितले.

# नागाव पीरवाडी समुद्रकिनारा स्वच्छता मोहीम

## ५०० विद्यार्थ्यांचा पुढाकार



**उरण : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, फुंडे आणि सागरी विकास मंच, राऊंड फॉरेस्ट कांदळवन, उरण वन विभाग, लायन्स क्लब वीर वाजेकर कॅम्पस यांच्या संयुक्त विद्यमाने उरण येथील नागाव पीरवाडी समुद्रकिनाऱ्यावर स्वच्छता मोहीम उत्साहात राबविण्यात आली.

पर्यावरण संवर्धन, सागरी जैवविविधतेचे संरक्षण आणि नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या मोहिमेत सुमारे ५०० विद्यार्थी व शिक्षकांनी सहभाग नोंदविला. वीर वाजेकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र दल यांच्या संयुक्त सहभागातून हा उपक्रम पार पडला. वीर वाजेकर महाविद्यालयासोबतच यू. इ. एस. कॉलेज, केडीएस कॉलेज, उरण तसेच काळसेकर कॉलेज, पनवेल येथील विद्यार्थ्यांनीही स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य आमोद ठक्कर यांनी आपल्या मनोगतात समुद्रकिनारा हा केवळ पर्यटनाचे ठिकाण नसून पर्यावरणीय समतोल, सागरी जैवविविधता आणि भविष्यातील अन्नसुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असल्याचे सांगितले.

"आपला सागरकिनारा, आपली जबाबदारी" या भावनेतून सातत्याने स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाच्या उपक्रमांमध्ये नागरिकांनी आणि विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. समुद्रकिनारी येणाऱ्या पर्यटकांनी कचरा इतरत्र न टाकता कचराकुंड्यांचा वापर करावा, यासाठी जागोजागी कचराकुंड्या उपलब्ध करून देण्याबरोबरच स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाचे संदेश देणारे पोस्टर्स लावण्यात आले. पर्यटकांमध्ये स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यावरही विशेष भर देण्यात आला. कार्यक्रमासाठी ग्रँडवेल कंपनी, हितेश शहा व कौशिक शाह यांच्याकडून विद्यार्थ्यांना हातमोजे, मास्क, पिण्याचे पाणी व अल्पोपहार उपलब्ध करून देण्यात आला. तसेच नागाव व म्हातवली ग्रामपंचायतीच्या वतीने कचरा संकलनासाठी कर्मचारी व घंटागाडी उपलब्ध करून देण्यात आली. यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी, सागरी विकास मंचाचे कार्यकर्ते, ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामसुधारणा मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

महाविद्यालयाचे उपप्राचार्य संदीप घोडके, राम गोसावी, बी.पी. पवार, राजकुमार कांबळे, आर.बी. पाटील, आर. एस. जावळे, श्रेया पाटील, पालवे, तांदळे, गजानन चव्हाण, श्रीकांत गोतपागर, झेलम झेंडे, सोनावले, भूषण ठाकूर, प्रांजल भोईर, तन्वी कोळी, प्रियांका ठाकूर, दीक्षित म्हात्रे, ऋतुजा घरत, रेणू माळी, देवेंद्र कांबळे, योगेश कुलकर्णी यांच्यासह महाविद्यालयातील अनेक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत विद्यार्थ्यांनी समुद्रकिनाऱ्यावरील प्लास्टिक व इतर कचरा संकलित करून स्वच्छता केली. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे ही स्वच्छता मोहीम यशस्वी ठरली.

# सिडकोच्या घर योजनेतील विजेत्यांना अनुदानासाठी आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

सिडकोच्या 'माझे पसंतीचे सिडकोचे घर' गृहनिर्माण योजनेतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विजेत्या अर्जदारांनी प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अर्थात पीएमएवाय अंतर्गत नोंदणी केलेली नसल्यास ती तत्काळ पूर्ण करावी, असे आवाहन सिडकोच्या वतीने करण्यात आले आहे.

ईडब्ल्यूएस प्रवर्गातील पात्र लाभार्थ्यांना केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत २.५० लाख रुपयांपर्यंतच्या अनुदानाचा लाभ मिळणार आहे. त्यासाठी पात्र अर्जदारांनी पीएमएवाय अंतर्गत नोंदणी पूर्ण करणे तसेच अनुदानासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता वेळेत करणे आवश्यक असल्याचे सिडकोने स्पष्ट केले आहे. सिडकोच्या माहितीनुसार ईडब्ल्यूएस प्रवर्गातील गृहनिर्माण योजनांची ठिकाणे पुढीलप्रमाणे आहेत : तळोजा सेक्टर २८ व ३९, खारघर बस डेपो सेक्टर १४, खारकोपर प्लॉट क्र. २९ व २६० सेक्टर १६ ए, कळंबोली बस डेपो सेक्टर १७, बामणडोंगरी, उलवे.

'माझे पसंतीचे सिडकोचे घर' योजनेतील विजेत्यांनी विहित मुदतीत संकेतस्थळावर लॉगिनद्वारे आवश्यक कागदपत्रे सादर करावीत तसेच विहित मुदतीत कन्फर्मेशन फी भरणे आवश्यक असून कागदपत्रे किंवा कन्फर्मेशन फी वेळेत सादर न केल्यास वाटप केलेली सदनिका रद्द होऊ शकते, असे सिडकोने नमूद केले. २.५० लाख रुपयांच्या अनुदानाचा लाभ घेण्यासाठी पात्र ईडब्ल्यूएस अर्जदारांनी केंद्र शासनाच्या पोर्टलवर पीएमएवाय एमआयएस बेनिफिशरी अटॅचमेंट प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. यासाठी आधारकार्ड संलग्न करणे अनिवार्य असून आवश्यकतेनुसार ओटीपीद्वारे पडताळणी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी अर्जदारांनी सहकार्य करावे, असे आवाहन सिडकोने केले आहे.

# नवी मुंबईत रिपाइंचा वर्धापन दिन होणार साजरा

**नवी मुंबई : बातमीदार**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट)चा ६९वा वर्धापन दिन ३ ऑक्टोबर रोजी वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. समाजकल्याणमंत्री तथा पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.




कार्यक्रमाला भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, वनमंत्री गणेश नाईक आणि आमदार मंदा म्हात्रे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती पक्षाचे जनरल सेक्रेटरी गौतम सोनवणे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला संविधान दिल्यानंतर सर्व समाज घटकांच्या हितासाठी रिपब्लिकन पक्षाची संकल्पना पुढे नेली. या विचारांना अभिवादन करण्यासाठी महाराष्ट्रासह देशभरातील पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष म्हणून प्रदेश उपाध्यक्ष सिद्राम ओहळ, तर निमंत्रक म्हणून नवी मुंबई जिल्हाध्यक्ष महेश खरे जबाबदारी सांभाळणार आहेत.

यावेळी चळवळीचे विचारवंत प्रा. खरे आणि ॲड. काकडे संवाद साधणार आहेत. पत्रकार परिषदेला प्रदेश उपाध्यक्ष सिद्राम ओहळ, नवी मुंबई जिल्हाध्यक्ष महेश खरे, नवी मुंबई परिवहन सदस्य यशपाल ओहळ आणि महिला आघाडी जिल्हाध्यक्ष बोदडे उपस्थित होते.

# नेरूळमध्ये सोसायटीच्या आवारातून रिक्षाची चोरी

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ येथील सेक्टर १ मध्ये असलेल्या विघ्नहर्ता सोसायटीच्या समोरील रस्त्यावरून उभी केलेली ऑटो रिक्षा अज्ञात चोरट्याने लांबविल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी नेरूळ पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार तक्रारदार महादेव भांडे हे रिक्षाचालक आहेत. त्यांनी शनिवारी दुपारी २ ते ५ वाजण्याच्या सुमारास आपली बजाज कंपनीची काळ्या-पिवळ्या रंगाची रिक्षा (क्र. एमएच ४३ एसी ४७३१) सोसायटीसमोरील रस्त्यावर पार्क केली होती. यावेळी अज्ञात चोरट्याने रिक्षा चोरून नेली. याबाबत भांडे यांनी नेरूळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# एपीएमसीमध्ये प्रतिबंधित गुटख्याचा साठा जप्त; तिघांवर गुन्हा

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी येथील एपीएमसी मार्केट परिसरात प्रतिबंधित गुटखा, पानमसाला आणि सुगंधित तंबाखूची विक्री होत असल्याचे उघडकीस आले आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने व एपीएमसी पोलिसांच्या मदतीने कारवाई करीत तीन पानटपरी चालकांकडून एकूण पाच हजार ३५१ रुपये किमतीचा प्रतिबंधित माल जप्त करण्यात आला आहे.

याप्रकरणी तिघांविरुद्ध एपीएमसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या अन्न सुरक्षा अधिकारी वर्षा रुस्तुमराव आडे यांना एपीएमसी मार्केट क्रमांक २, फेज २, दाणा मार्केट परिसरात प्रतिबंधित गुटख्याची विक्री होत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार २६ सप्टेंबर रोजी दुपारच्या सुमारास पथकाने पोलिसांच्या मदतीने संबंधित ठिकाणी छापा टाकला. या कारवाईत विमल पानमसाला, व्ही-१ तंबाखू, तुलसी, राजश्री, के. पी. डबल ब्लॅक आणि रजनीगंधा यांसह विविध प्रतिबंधित पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला.

याप्रकरणी मनोजकुमार चिरकू वर्मा (२५), राजेश घुरभारी यादव (४४) आणि रवी मुन्नाराम राजाराम (३२) या तिघांविरुद्ध कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून अनुक्रमे ६६४ रुपये, ८७३ रुपये आणि तीन हजार ८१४ रुपये किमतीचा माल जप्त करण्यात आला. अन्न सुरक्षा अधिकारी वर्षा आडे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास एपीएमसी पोलीस करीत आहेत.



**पनवेल : खांदा कॉलनी बॅटमिंटन क्लब (केबीसी) ग्रुपचे वार्षिक स्नेहसंमेलन मानघर येथील लीला फार्म येथे उत्साहात पार पडले. याचे नियोजन केबीसी ग्रुपचे अध्यक्ष प्रकाश जाधव व वैभव पाटील यांनी केले.**

# कोपरखैरणेतील जिमचालकाला जीवे मारण्याची धमकी

## सहा जणांविरुद्ध गुन्हा

**नवी मुंबई : बातमीदार**

कोपरखैरणे येथील एका फिटनेस जिममध्ये घुसून मालकाला शिवीगाळ, मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी कोपरखैरणे पोलीस ठाण्यात आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार २५ सप्टेंबर रोजी विवेक लक्ष्मण पाटील (३२, रा. घणसोली) यांनी कोपरखैरणे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

विवेक पाटील हे कोपरखैरणे सेक्टर ४ ए मधील 'फिटनेस स्क्वेअर जिम'चे मालक व ट्रेनर आहेत. २१ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ ते ७ च्या दरम्यान पाटील हे त्यांच्या वैयक्तिक केबिनमध्ये एका मैत्रिणीशी चर्चा करत होते. त्यावेळी आरोपी चेतन पाटील, प्रतिक शिवपुजे आणि हातात दगड घेतलेला एक अनोळखी इसम तसेच इतर तीन इसम तेथे आले. त्यांनी "दिखाऊ क्या तेरे को" आणि "दादा मै इसको नही छोडेगा" असे म्हणत पाटील यांना शिवीगाळ करत मारहाण केली व जीवे मारण्याची धमकी दिली.

यानंतर चेतन पाटील आणि त्याच्या सहकाऱ्यांनी गैरकायदेशीर जमाव जमवून विवेक पाटील यांना पुन्हा मारहाण करत ठार मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी तक्रारदाराच्या जबाबावरून कोपरखैरणे पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक अमोल देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सविता मोहिते या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.

# पनवेलकरांना घडणार लालबागचा राजाचे दर्शन

**पनवेल : वार्ताहर**

मुंबईतील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या लालबागचा राजाचे दर्शन आता पनवेलकरांसह रायगड आणि नवी मुंबई परिसरातील भाविकांना घेता येणार आहे. महात्मा ज्योतिबा फुले हातगाडी संघटना आणि फळभाजी विक्रेते सहकारी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित गौरा गणेश उत्सवानिमित्त लालबागच्या राजाची हुबेहूब प्रतिकृती मंगळवारी (दि. २९) पनवेलमध्ये विराजमान होणार आहे. या उत्सवाचे यंदा ३४वे वर्ष आहे.

गेल्या ३३ वर्षांपासून हा उत्सव सामाजिक बांधिलकी जोपासत साजरा केला जात असून संघटनेचे सुमारे तीन हजारांहून अधिक सभासद त्यात सहभागी होतात. हातगाडी, फळभाजी विक्री तसेच अन्य छोटे-मोठे व्यवसाय करणाऱ्या सभासदांना गणेशोत्सवाच्या काळात व्यवसायामुळे उत्सवाचा आनंद घेता येत नाही. ही बाब लक्षात घेऊन सर्व सभासदांना एकत्रितपणे गणेशोत्सव साजरा करता यावा या उद्देशाने ३३ वर्षांपूर्वी गौरा-गणेश उत्सवाची सुरुवात करण्यात आली. मंगळवारी सकाळी ८ वाजता महापौर



नितीन पाटील यांच्या हस्ते गौरा गणेशपूजन होणार आहे.

उत्सवाच्या सुरुवातीच्या काळात विविध गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना केली जात होती. मात्र, गेल्या २७ वर्षांपासून लालबागच्या राजाची हुबेहूब प्रतिकृती तयार करून तिची प्रतिष्ठापना करण्याची परंपरा कायम आहे. लालबागच्या राजाची मूर्ती साकारणारे प्रसिद्ध मूर्तिकार संतोष कांबळी आणि त्यांचे सहकारी गेल्या १५ ते २० दिवसांपासून पनवेलमध्येच या भव्य मूर्तीच्या निर्मितीचे काम करत आहेत. मूर्तीच्या धोतराची सजावट रुपेश पवार करत आहेत. उत्सवादरम्यान आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात येणार आहे.

या उत्सवात सर्व धर्मीय भाविक जातपात आणि भेदभाव विसरून सहभागी होत असल्याचे आयोजकांनी सांगितले. उत्सवादरम्यान आयोजित महाप्रसादाचा लाभ ७० हजारांहून अधिक भाविक घेत असल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच मुंबई, ठाणे, विरार, पालघर, नवी मुंबई आणि रायगड जिल्ह्यातून पाच लाखांहून अधिक भाविक या मार्केटच्या राजाच्या दर्शनासाठी येत असल्याचे आयोजकांचे म्हणणे आहे.

मुंबईतील लालबागच्या राजाचे दर्शन घेणे शक्य न झालेल्या तसेच नवस पूर्ण झाल्यानंतर दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांचीही मोठी गर्दी पनवेलमध्ये होते. या उत्सवामुळे हातगाडी व छोट्या व्यवसायिकांमध्येही उत्साहाचे वातावरण निर्माण होते, असे संघटनेचे अध्यक्ष एस. के. नाईक यांनी सांगितले. दीड दिवसाच्या या उत्सवानंतर बुधवारी ३० सप्टेंबर रोजी लालबागच्या राजाच्या प्रतिकृतीचे शाही थाटात आणि भावपूर्ण वातावरणात विसर्जन करण्यात येणार असल्याची माहिती गौरा गणेश उत्सवाचे अध्यक्ष प्रल्हाद नाईक यांनी दिली.

# पामबीच मार्गावर टॅक्सी-रिक्षाचा अपघात

## महिला बँक अधिकाऱ्याचा मृत्यू

**नवी मुंबई : बातमीदार**

पामबीच मार्गावरील सरसोळे जंक्शन येथे टॅक्सीने रिक्षाला दिलेल्या धडकेत महिला बँक अधिकाऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. नेहा गुप्ता (३६) असे मृत महिलेचे नाव असून त्या युनियन बँकेत अधिकारी म्हणून कार्यरत होत्या. रविवारी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास हा अपघात घडला. बँक कर्मचाऱ्यांचा सोमवारपासून तीन दिवसांचा संप असल्याने रविवारी बँका सुरू ठेवण्यात आल्या होत्या. त्यामुळे नेहा गुप्ता रविवारी कामावर हजर झाल्या होत्या. काम आटोपून त्या रिक्षाने घरी परतत असताना सरसोळे जंक्शनजवळ त्यांच्या रिक्षाला टॅक्सीने धडक दिली.

या अपघातात त्या गंभीर जखमी झाल्या. त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. दरम्यान, मुलाच्या देखभालीमुळे रविवारी कामावर येणे शक्य नसल्याचे नेहा गुप्ता यांनी वरिष्ठांना कळविले होते, असा दावा करणारी पोस्ट सोशल मीडियावर प्रसारित होत आहे, मात्र या दाव्याची अधिकृत पुष्टी झालेली नाही. याप्रकरणी टॅक्सीचालक मोबीन शेख (३५) याच्याविरोधात नेरूळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अपघाताच्या कारणांचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.




# नशामुक्त भारत, स्वस्थ भारतचा संदेश

**नवी मुंबई : बातमीदार**

राष्ट्रीय सेवा योजना दिन आणि जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त एनएसएस युनिट एसडी-६८तर्फे सीवूड्स परिसरात जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. रॅलीदरम्यान नशामुक्त भारत, स्वस्थ भारत आणि प्रतिजैविक प्रतिकारशक्ती याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली.

त्यानंतर ग्रँड सेंट्रल मॉल, सीवूड्स येथे स्वयंसेवकांनी व्यसनमुक्त भारत या विषयावर प्रभावी पथनाट्य सादर केले. पथनाट्याद्वारे व्यसनांचे दुष्परिणाम आणि व्यसनमुक्त समाजाचे महत्त्व याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमाला प्राचार्य रुपेश पिंगळे, पालिकेचे विजय नाईक, प्राध्यापक वृंद आणि स्वयंसेवक उपस्थित होते. या उपक्रमाचे समन्वयन दीपक पोखरकर यांनी केले.

# महाड एमआयडीसी स्फोटाने हादरली!

## सिनर्जीया कंपनीत दुर्घटना; सहा कामगार जखमी





**महाड : प्रतिनिधी**

महाड औद्योगिक क्षेत्रातील सिनर्जीया केमिकल कंपनीमध्ये रिॲक्टरचा स्फोट झाल्याने संपूर्ण परिसर हादरला. पाच ते दहा किलोमीटर अंतरापर्यंत या स्फोटाचे हादरे बसल्याचे सांगण्यात येत आहे. या कंपनीतील सहा कामगार किरकोळ जखमी झाले आहेत.

महाड एमआयडीसीमधील सी-५६ या प्लॉटमधील सिनर्जीया केमिकल इंडस्ट्रीज या कंपनीमध्ये रात्री दहाच्या सुमारास स्फोट झाला. कंपनीतील रासायनिक प्रक्रिया सुरू असलेल्या रिॲक्टरचा स्फोट झाला असून या स्फोटामुळे परिसरातील गावांमध्ये हादरे बसले. या हादऱ्यामुळे स्थानिक ग्रामस्थ भयभीत झाले. ग्रामस्थांनी स्फोट कुठून झाला याचा शोध सुरू केला असता सिनर्जीया केमिकल कंपनीमध्ये हा स्फोट झाल्याचे निदर्शनास आले.

कंपनीमध्ये रात्रपाळीसाठी दहा कामगार असल्याची प्राथमिक माहिती उपलब्ध झाली असून यातील एकच कामगार जखमी झाल्याची सुरुवातीस नोंद होती, मात्र हा आकडा आता सहावर जाऊन पोहोचला आहे. जखमींमध्ये नितीन लक्ष्मण लाड, परेश सकपाळ, ओंकार फराटे, नंदकिशोर सावंत, सुनील पुरी, पोपिन दल, हर्षद लहू यादव, असे सहा जण जखमी झाले आहेत. या जखमी कामगारावर महाड शहराधील एका खाजगी दवाखान्यामध्ये उपचार सुरू करण्यात आले आहेत. उर्वरित नऊ कामगार सुरक्षित असल्याची माहिती कंपनी प्रशासनाने दिली.

स्फोट झाल्यानंतर या कंपनीतील लोखंडी सामान, रिॲक्टरचे भाग, पत्रे, सिमेंट पत्रे आदी साहित्य निकम इंडस्ट्रीज, धारिया इम्पेक्स, प्रिव्ही स्पेशालिटी, पिडीलाईट यासह अन्य कंपन्यांत जाऊन पडले आहे. शेजारील कंपन्यांत जाऊन पडलेले हजारो किलोचे लोखंड पाहिल्यानंतर याठिकाणी कामगार असते तर मोठी दुर्घटना किंवा जीवितहानी झाली असती. सुदैवाने रात्रपाळी असल्याने कामगार संख्यादेखील कमी होती. घटना घडल्यानंतर या परिसरातील गावातील नागरिकांनी कंपनीच्या प्रवेशद्वाराजवळच गर्दी केली.

यामुळे या ठिकाणी काही काळ तणाव निर्माण झाला. पोलिसांनी अन्य पोलीस ठाण्यामधून अधिक पोलीस कुमक बोलावली आणि ग्रामस्थांना शांत केले. यावेळी घटनास्थळी महाड तालुका पोलीस उपअधिकारी प्रदीप काळे, तहसीलदार संतोष शितोळे, महाड शहर पोलीस निरीक्षक एकशिंगे, एमआयडीसी पोलीस निरीक्षक उपस्थित होते.

# मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर कंटेनर, टेम्पो दरीत कोसळले; एकाचा मृत्यू



**खोपोली,खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर आज सकाळी एका कंटेनरने समोरील टेम्पोला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला असून या अपघातानंतर दोन्ही वाहने ५० फूट दरीत कोसळल्याने कंटेनर चालकाचा जागीच मृत्यू झाला तर टेम्पो चालक जण जखमी झाला आहे.

एक्सप्रेस वेवरून पुण्याहून मुंबईकडे कंटेनर क्रमांक( MH ४३ Y ३५७०) हा चालक मोहमद कैफ( २४ रा आंबेडकरनगर उत्तरप्रदेश) हा पुण्याहून मुंबई कडे आपल्या ताब्यातील कंटेनर घेऊन जातं असताना बोरघाटात ढेकू गावच्या हद्दीत आला असता चालकाचे कंटेनर वरील नियंत्रण सुटल्याने त्याने समोरील टाटा टेम्पो क्रमांक (MH ०४ LQ ४३१३ ला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने रस्त्याच्या बाजूला असलेल्या खोल दरीत कंटेनर आणि टेम्पो कोसळला या अपघातात कंटेनरच्या केबिन मध्ये चालक अडकून त्याचा जागीच मृत्यू झाला तर टेम्पो चालक मीराज शेख (वय २९ ) हा जखमी झाला आहे.

या अपघाताची माहिती मिळताच बोरघाट महामार्ग पोलीस, आयआरबी यंत्रणा, हेल्प फाउंडेशनचे सदस्य, देवदूत यंत्रणा, डेल्टा फोर्स, महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान, लोकमान्य हॉस्पिटलची ॲम्ब्युलन्स एफकोन कंपनीची टीम तात्काळ घटनास्थळी दाखल होत अपघातग्रस्त वाहना मध्ये अडकलेल्या जखमी चालकाला बाहेर काढून पुढील उपचारासाठी खोपोली नगरपालिकेच्या रुग्णालयात पुढील उपचारासाठी पाठविण्यात आले आहे.

# खालापूर तालुका रा.स्व. संघ परिवाराचे सागरी किनारा स्वच्छता अभियान

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुका संघ परिवाराच्या वतीने सागरी किनारा स्वच्छता अभियानकाल सकाळी अलिबाग बीचवर राबवण्यात आले संरक्षण गतिविधि माध्यमातून २५ स्वयंसेवक खोपोली व खानापूर तालुक्यातून अलिबाग येथे जाऊन "सागरी किनारे स्वच्छता अभियान" केले. ५० किलो च्या २३ बॅग साधारण १२५० किलो प्लास्टिक कचरा गोळा केला

अलिबाग उपनगराध्यक्ष मानसी मात्रे या खोपोलीकरांचे आभार मानण्यासाठी जातीने बीचवर हजर



होत्या..तसेचअलिबाग नगरपालिका सी ओ ,आर्या मॅडम नगरपालिका आरोग्य अधिकारी तसेच स्थानिक नगरसेवक उपस्थित होते.

या सेवाभावी कार्याचे कौतुक करताना उपनगराध्यक्ष मानसी म्हात्रे यांनी अलिबाग शहरात व परिसरात कशाप्रकारे स्वच्छता राखली जाते याची व स्वच्छ अलिबाग अभियानाची त्यांनी माहिती दिली.

सलग सहा वर्ष आपण खालापूर तालुक्यातून जाऊन सागरी किनारा स्वच्छ अभियान राबवत आहोत संघ परिवारातील या स्वयंसेवकांचे सातत्य/ सेवाभावी आणि निस्वार्थी कार्याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले.खोपोलीतून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा पर्यावरण गत विधीचे स्वयंसेवक अतुल कोठारी ज्येष्ठ स्वयंसेवकआणि संघाचे २५ स्वयंसेवकांनी भाग घेतला.

## रेवदंडा विभागात सार्वजनिक मंडळांमध्ये साखरचौथ श्री गणेशोत्सवाचा उत्साह

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा परिसरात सार्वजनिक साखरचौथ श्री गणेशोत्सवाचा उत्साह शिगेला पोहोचला असून, गावागावांत मंडप उभारणी, विद्युत रोषणाई तसेच सजावटीची लगबग सुरू आहे. रेवदंडा पोलिस ठाण्याच्या हद्दीत एकूण २४ ठिकाणी सार्वजनिक मंडळांतर्फे साखरचौथ श्री गणेशोत्सव साजरा करण्यात येत आहे.

साखरचौथ श्री गणेशोत्सवाला २९ सप्टेंबरपासून सुरुवात होत असून, अनेक मंडळांतर्फे आदल्या दिवशी सायंकाळच्या सुमारास गणरायाचे आगमन करण्यात येणार आहे. त्यामुळे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व सदस्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

# कशेडी घाटात मच्छीचा कंटेनर उलटला

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर भरदुपारी एक वाजण्याच्या सुमारास अलिबाग येथून रत्नागिरीला जाणारा मच्छीने भरलेला कंटेनर कशेडी घाटातील धामणदेवी गावाजवळ कलंडला. यावेळी टँकजवळ धूर निघत असल्याने रामेश्वर साळुंखे यांनी ॲम्बुलन्स, पोलादपूर पोलीस, महाड एमआयडीसीचा आणि महाड नगरपालिकेचा अग्निशमन बंब यांना कळवून अपघातस्थळी पाचारण केले. अग्निशमन दलाच्या कर्मचार्यांनी कंटेनरच्या डिझेल टँकजवळून निघणाऱ्या धुरावर पाण्याचा मारा करून आग पुर्णपणे नियंत्रणात आणली.


**पनवेल महानगरपालिका, पनवेल**
तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड ४१०२०६

जा.क्र.पमपा/सचिव/२०-२६/प्र.क्र.१०/३४३/२६
महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २८/०९/२०२६

**पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सूचना**

प्रति,
श्री. /श्रीमती.
मा.सदस्य/सदस्या,
पनवेल महानगरपालिका, पनवेल.
महोदय/ महोदया,

पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा क्र.१०, मंगळवार दिनांक ०६/१०/२०२६ रोजी, सकाळी ११:३० वाजता, महापालिकेच्या "आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल" येथे खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी बोलविण्यात आली आहे.

**सर्वसाधारण सभा क्रमांक १०, दिनांक ०६/१०/२०२६ ची विषयपत्रिका**

**१. मागील विशेष सर्वसधारण सभा क्र. ०७ दि. ०७/०८/२०२६ (अर्थसंकल्प), सर्वसाधारण सभा क्र.०८ दि.२०/०८/२०२६ तसेच विशेष सर्वसधारण सभा क्र.०९ दि. ०९/०९/२०२६ रोजींच्या सभांचे इतिवृत्त कायम करणे.**
**२. शासकीय पत्रव्यवहार**
**३. प्रश्नोत्तरे**
**४. मा. आयुक्त महोदयांकडील कार्यालयीन कामकाज :**
**१. दिनांक २४/०४/२०२६ रोजीचा स्थगित विषय –** पनवेल महानगरपालिका हद्दीमधील प्रभाग समिती अ, ब, क व ड मध्ये अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम निष्कासन करणेकामी मनुष्यबळ, यंत्रसामुग्री व वाहने पुरविणेकामी निविदा मागविणेबाबत.
**२. दिनांक २२/०७/२०२६ रोजीचा स्थगित विषय –** पनवेल महानगरपालिकेचा सन २०२५ – २६ या कालावधीकरिता मुंबई विद्यापीठामार्फत तयार करण्यात आलेला पर्यावरण सद्यस्थिती अहवाल (ESR) मा. सर्वसाधारण सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेबाबत.
३. पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती – ब व इतर रस्त्यालगत असणाऱ्या गटार, पादचारी मार्गामधील इन्स्पेक्शन चेंबर्स वर वेळोवेळी आवश्यकतेनुसार २०२६ – २७ व २०२७–२८ या दोन वर्षाकरिता झाकणे लावणे व किरकोळ दुरुस्ती करणे.
४. पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती – क, प्रभाग क्र. ११,१२,१३ व १४ मध्ये समाविष्ठ होणाऱ्या गटारांची सन २०२६ – २७ व २०२७–२८ या दोन वर्षाकरीता रस्त्यालगत असणाऱ्या गटार, पादचारी मार्गामधील इन्स्पेक्शन चेंबर्स वर वेळोवेळी आवश्यकतेनुसार झाकणे लावणे व किरकोळ दुरुस्ती करणे.
५. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिका मालकीच्या इमारतीची देखभाल व दुरुस्ती (नुतणीकरण) वार्षिक तत्वावर करणे. (२ वर्षाकरिता, सन २०२६–२७ व २०२७–२८ करिता )
६. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती – क, कामोठे येथील रस्त्यांवर महापालिका मालकीच्या मोकळ्या भुखंडावर वार्षिक तत्वावर माहिती दर्शक फलक बसविणे व रोड मार्किंग करणे. (२ वर्षाकरिता, सन २०२६ २७ व २०२७–२८ करिता )
७. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती – ड व इतर रस्त्यालगत असणाऱ्या गटार, पादचारी मार्गा मधील इन्स्पेक्शन चेंबर्स वर वेळोवेळी आवश्यकतेनुसार २०२६–२७ व २०२७–२८ या दोन वर्षाकरिता झाकणे लावणे व किरकोळ दुरुस्ती करणे.
८. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती – ड पनवेल येथील रस्त्यांवर महापालिका मालकीच्या मोकळ्या भुखंडावर वार्षिक तत्वावर माहिती दर्शक फलक बसविणे व रोड मार्किंग करणे. (२ वर्षाकरिता, सन २०२६–२७ व २०२७–२८ करिता )
९. रायगड जिल्हा परिषदेच्या एकूण ५१ शाळा पनवेल महानगरपालिकेकडे हस्तांतरित करणेबाबत.
१०. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील कळंबोली येथील लोकनेते दि. बा. पाटील मैदान, से.१० ई येथे पथदिप खांब उभारुन कार्यान्वित करणे.
११. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील पिसार्वे व करवले गावाकडे जाणारा रस्ता या ठिकाणी पथदिप खांब उभारुन कार्यान्वित करणे.
१२. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील धानसर गाव व धानसर गावाकडे जाणारा रस्ता या ठिकाणी पथदिप खांब उभारुन कार्यान्वित करणे.
१३. पनवेल महानगरपालिका हद्दीतील नविन पनवेल येथील सेक्टर ०८, भुखंड क्र.१२९ या उद्यानाची दुरुस्ती करणे.
१४. पनवेल महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकरीता १०००० लिटर क्षमतेचे नवीन २० नग वॉटर टँकर वाहने खरेदी करणे.
१५. सन २०२६ – २७ वर्षासाठी पनवेल महानगरपालिकेच्या नागरी आरोग्य केंद्रे, नागरी वर्धिनी केंद्रे येथे येणाऱ्या रुग्णांना औषधोपचार करण्याकरता ई – निविदा प्रसिध्द करणेस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.
१६. सन २०२६–२७ या शैक्षणिक वर्षातील पनवेल महानगरपालिका शाळेय जिल्हास्तरीय विविध खेळांच्या क्रिडा स्पर्धाचे आयोजन करण्यास अपेक्षित खर्चास सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

**(मा. महापौर महोदय यांचे मंजुरीने व आदेशान्वये)**

**सही/-**
**नानासाहेब कामठे**
**महापालिका सचिव**
पनवेल महानगरपालिका

महापालिका भवन, पनवेल
दिनांक :- २८/०९/२०२६.

**सोबत –** विषयांचे गोषवारे तसेच विशेष सर्वसधारण सभा क्र. ०७ दि. ०७/०८/२०२६ (अर्थसंकल्प), सर्वसाधारण सभा क्र.०८ दि.२०/०८/२०२६ तसेच विशेष सर्वसधारण सभा क्र.०९ दि. ०९/०९/२०२६ रोजीच्या सभांचे इतिवृत्त.


# आंबेवाडीच्या विसर्जन घाटावर कचऱ्याचे साम्राज्य

## आरोग्याचा गंभीर प्रश्न ऐरणीवर



**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील आंबेवाडी ग्रामपंचायत हद्दीतील विसर्जन घाट व नदी परिसरात सध्या कचऱ्याचे ढीग आणि कोंबड्यांची घाण यामुळे दुर्गंधीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. नदीपात्रातच कोंबड्यांची घाण व इतर कचरा टाकला जात असल्याने परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, ग्रामपंचायतीच्या स्वच्छता व्यवस्थेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

विशेष म्हणजे या विभागाचे नेतृत्व बलाढ्य राजकीय नेते, आमदार-खासदार करीत असतानाही साधा कचरा आणि स्वच्छतेचा प्रश्न मार्गी लागत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचा सूर उमटत आहे. विकासाच्या मोठमोठ्या घोषणा होत असताना नदीकाठची ही अस्वच्छता आणि दुर्गंधी नागरिकांच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते, अशी भीती व्यक्त होत आहे. विसर्जन घाट हा धार्मिकदृष्ट्या तसेच सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचा परिसर आहे. मात्र याच ठिकाणी कचऱ्याचे ढीग, कोंबड्यांची घाण आणि दुर्गंधी पसरल्याने नागरिकांना नाक मुठीत धरून परिसरातून मार्ग काढावा लागत आहे. नदीपात्रात अशा प्रकारे घाण टाकली जात असल्याने नदी प्रदूषणासोबतच भविष्यात रोगराई पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सामाजिक कार्यकर्ते राकेश लोखंडे यांनी या प्रकाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली असून, नदी परिसराची तात्काळ स्वच्छता करण्याची मागणी केली आहे. नदीमध्ये कचरा आणि कोंबड्यांची घाण टाकणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. नदी ही नागरिकांच्या जीवनाशी जोडलेली नैसर्गिक संपत्ती असून, तिचे प्रदूषण रोखण्यासाठी ग्रामपंचायत प्रशासनाने केवळ सूचना न देता प्रत्यक्षात कठोर कारवाई करणे गरजेचे असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

याबाबत ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक पाटील यांनी सांगितले की, नदी परिसरात कोंबड्यांची घाण टाकणाऱ्यांना यापूर्वीच नोटिसा देण्यात आलेल्या आहेत. सध्या डम्पिंग ग्राउंड उपलब्ध नसल्यामुळे काही प्रमाणात ही परिस्थिती निर्माण झाली आहे. मात्र दुकानदारांनी किंवा नागरिकांनी नदीमध्ये कचरा टाकू नये, अन्यथा संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.तसेच येत्या दोन ते तीन दिवसांत नदी परिसरात कचरा टाकणाऱ्या व्यक्तींविरोधात पोलीस ठाण्यात पत्र देऊन गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली जाईल, अशी माहिती त्यांनी दिली.

आंबेवाडी ग्रामपंचायत ही रोहा तालुक्यातील प्रतिष्ठित ग्रामपंचायत म्हणून ओळखली जाते. या परिसराला राजकीयदृष्ट्याही मोठे महत्त्व आहे. त्यामुळे बलाढ्य राजकीय नेतृत्व असलेल्या या गावात नदीसारख्या मूलभूत प्रश्नाकडे दुर्लक्ष का? असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. कचरा व्यवस्थापनासाठी कायमस्वरूपी उपाययोजना, नदी परिसराची नियमित स्वच्छता आणि कचरा टाकणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली, तरच या समस्येला आळा बसू शकतो.

# नेरळ-कर्जत येथे जेएसएस रायगडकडून वृक्षारोपण आणि स्वच्छता श्रमदान जनजागृती




**कर्जत : रामप्रहर वृत्त**

जनसामान्यांमध्ये प्रचार व प्रसाराच्या माध्यमातून विविध सरकारी योजना, स्वच्छता जनजागृती माहिती, आरोग्य विषयक जन जागृती, कौशल्य विकास उपक्रम आदिंना प्रोत्साहन देण्याच्या उददेशाने जन शिक्षण संस्थान रायगड व करिअर टेक्निकल इन्स्टिट्यूटचे निहारिका फाउंडेशन यांच्या माध्यमातून सोमवार दि. २८ सप्टेंबर रोजी "नेरळ-कर्जत" येथे "वृक्षारोपण व स्वच्छता श्रमदान जनजागृती" करण्यात आले, तसेच कार्यक्रमाला उपस्थित असणाऱ्या प्रशिक्षणार्थी यांना कार्यक्रमाप्रसंगी प्रशिक्षक गणेश भोपी यांच्या माध्यमातून स्वछ्तेची शपथही देण्यात आली. तर नवीन भोपी (जनसंपर्क अधिकारी – कौशल्य विकास मंत्रालय, मुंबई) यांनी लाभार्त्यांना सार्वजनिक स्वच्छतेवर मार्गदर्शन केले.

संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्ष रत्नप्रभा बेल्हेकर, संचालक डॉ. विजय कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्याभरात जे. एस. एस. रायगडच्या माध्यमातून १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर या १५ दिवसांच्या कालावधीत विविध स्वच्छतेवर आधारित जनजागृती कार्यक्रम व उपक्रम स्वच्छता ही सेवा उपक्रमाअंतर्गत राबविण्यात येत असल्याची माहिती संचालक डॉ. विजय कोकणे यांनी दिली आहे.

''कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार'' यांच्या विशेष पुढाकारातून संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये व्यवसाय प्रशिक्षणाचे कार्य मागील २१ वर्ष पासून सक्रिय पणे सुरु आहे व आता पर्यंत ८० हजार पेक्षा जास्त लाभार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण देण्यात आले आहे. याच स्वच्छता, आरोग्य व जनजागृती उपक्रमाचा एक भाग म्हणून "नेरळ-कर्जत" ह्या ठिकाणी "वृक्षारोपण व स्वच्छता श्रमदान जनजागृती" या उपक्रमाप्रसंगी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी सौ. कल्पना म्हात्रे, श्री. नवीन भोपी (जनसंपर्क अधिकारी – कौशल्य विकास मंत्रालय, मुंबई), प्राध्यापक हिमांशू अग्रवाल आयटी, प्रशिक्षक गणेश भोपी, प्रशिक्षक अविनाश डायरे व प्रशिक्षणार्थी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम उत्साहात पार पडला.

# ‘विराट’ शतकाने अनेक विक्रम मोडले



**तिरुवनंतपुरम : वृत्तसंस्था**

वेस्ट इंडिजविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात भारताचा स्टार फलंदाज विराट कोहलीने पुन्हा एकदा ऐतिहासिक कामगिरीची नोंद केली आहे. तिरुवनंतपुरमच्या ग्रीनफील्ड आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर कोहलीने वादळी फलंदाजीचे दर्शन घडवत आपल्या एकदिवसीय कारकिर्दीतील ५५वे दिमाखदार शतक झळकावले. षटकार खेचून पूर्ण केलेल्या या शतकी खेळीसह कोहलीने अनेक जागतिक विक्रम मोडीत काढले.

सामन्यात विजयासाठी मिळालेल्या २९६ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना भारताची पहिली विकेट ७४ धावांवर पडल्यानंतर विराट कोहली मैदानात उतरला. त्याने अवघ्या ४० चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले आणि कर्णधार शुबमन गिल (११०)सोबत दुसऱ्या विकेटसाठी १५१ धावांची निर्णायक शतकीय भागीदारी रचून संघाला भक्कम स्थितीत आणले.

**सचिनच्या ‘लिस्ट ए’ विक्रमाशी बरोबरी**

या शतकासह विराट कोहलीने ‘लिस्ट ए’ क्रिकेटमधील ६०वे शतक पूर्ण केले. यापूर्वी ‘लिस्ट ए’ प्रकारात सर्वाधिक ६० शतके झळकावण्याचा विक्रम सचिन तेंडुलकर याच्या नावावर होता. आता या विक्रमात कोहलीने सचिनशी बरोबरी साधली आहे.

**जलद १५ हजार एकदिवसीय धावा**

आपल्या ३१५व्या सामन्यातील ३०३व्या डावात विराट कोहलीने १५ हजार एकदिवसीय धावांचा टप्पा पार केला. सचिन तेंडुलकर यांनी ३७७ डावांत ही कामगिरी केली होती. त्यामुळे कोहली आता एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वात जलद एवढ्या धावा करणारा फलंदाज ठरला आहे. एकंदरीत सर्वाधिक धावांच्या यादीत कोहली (सुमारे ६०ची सरासरी) केवळ सचिन तेंडुलकर (१८,४२६ धावा) यांच्यानंतर दुसऱ्या स्थानावर आहे.

**दोन वेगवेगळ्या संघांविरुद्ध १०-१० शतके झळकावणारा पहिलाच फलंदाज**

वेस्ट इंडिजविरुद्ध विराट कोहलीचे हे एकदिवसीय कारकिर्दीतील १०वे शतक ठरले. त्याने विंडीजविरुद्ध ४४ सामन्यांत २,३५०हून अधिक धावा केल्या आहेत. श्रीलंकेविरुद्धही त्याच्या खात्यावर १० शतके नोंद आहेत. एकदिवसीय क्रिकेटमध्ये दोन वेगवेगळ्या प्रतिस्पर्धी संघांविरुद्ध प्रत्येकी १० किंवा त्याहून अधिक शतके झळकावणारा तो जगातील पहिलाच फलंदाज बनला आहे. (ऑस्ट्रेलियाविरुद्धही त्याच्या नावावर आठ शतके आहेत).

**घरच्या मैदानावर सचिनच्या विक्रमाची बरोबरी**

भारतात खेळताना कोहलीचे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील हे ४२वे शतक ठरले. मायदेशात सर्वाधिक आंतरराष्ट्रीय शतके झळकावण्याच्या सचिन तेंडुलकर (४२ शतके) यांच्या विक्रमाशी त्याने बरोबरी केली.



# सायकलिंग चॅम्पियनशिपमध्ये मध्य रेल्वेला उपविजेतेपद

**रोहा : प्रतिनिधी**

जयपूर (राजस्थान) येथील सवाई मानसिंग स्टेडियममधील सायकलिंग वेलोड्रोमवर आयोजित ६३व्या अखिल भारतीय रेल्वे ट्रॅक सायकलिंग चॅम्पियनशिपमध्ये मध्य रेल्वेने उपविजेतेपदाची ट्रॉफी पटकावली.

उत्तर पश्चिम रेल्वेच्या यजमानपदाखाली झालेल्या या स्पर्धेत रेल्वेच्या नऊ संघांनी आठ प्रकारांमध्ये सहभाग घेतला होता. मध्य रेल्वेने तीन सुवर्ण आणि एक रौप्य पदकासह एकूण ४७ गुण मिळवले.

मध्य रेल्वेला १५ किमी स्क्रॅच रेस, टीम स्प्रिंट आणि पुरुषांच्या चार किमी टीम परसूट या प्रकारांमध्ये सुवर्णपदके मिळाली. अजयपाल सिंग याने १५ किमी स्क्रॅच रेसमध्ये सुवर्णपदक जिंकले.

टीम स्प्रिंटमधील सुवर्णपदक विशेष महत्त्वाचे ठरले, कारण अखिल भारतीय रेल्वे चॅम्पियनशिपमधील या प्रकारात मध्य रेल्वेने जिंकलेले हे पहिलेच सुवर्णपदक होते. १२ वर्षांच्या कालावधीनंतर पुरुषांच्या चार किमी टीम परसूट प्रकारात सुवर्णपदक जिंकून मध्य रेल्वेने एक महत्त्वपूर्ण कामगिरी नोंदवली.

विजेत्या संघात अजयपाल सिंग, सुशांत, दिलवार, विवेक कुमार, कपिल, अथर्व पाटील आणि तोला राम दुडी यांचा समावेश होता. सर्वांचे अभिनंदन करण्यात आले.

## ठाणे जिल्हा निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

# संघर्ष मंडळ, उजाला-वळ, रॅडीकल स्पोर्ट्स, श्री स्वामी समर्थ संघांची विजयी सलामी

**ठाणे : प्रतिनिधी**

संघर्ष मंडळ, उजाला-वळ, रॅडीकल स्पोर्ट्स, ओम् संघ, श्री स्वामी समर्थ यांनी ठाणे जिल्हा कबड्डी असोसिएशनने विजय मंडळाच्या सहकार्याने आयोजित केलेल्या कुमार गट कबड्डी स्पर्धेत पहिल्या साखळी विजयाची नोंद केली. जय बजरंग-वाशिंदने दोन्ही सामने जिंकत बाद फेरी गाठली.



भिवंडीच्या काल्हेर येथील विजय मंडळाच्या पटांगणावर सुरु असलेल्या कुमारांच्या अ गटात संघर्ष मोहने संघाने ग्रीफिन जिमला २५-२४ असे चकविले. मध्यंतरला १२-०९ अशी आघाडी घेणाऱ्या संघर्षने नंतर सावध खेळ करीत हा निसटता विजय मिळविला. हर्ष साळुंखे, मंथन सोनकर यांच्या संयमी व धोरणात्मक खेळाला याचे श्रेय जाते. ग्रीफिनच्या आशिष धनावडे, श्रेयस पवार यांनी शेवटच्या क्षणापर्यंत निकराची लढत दिली. उजाला-वळ संघाने ड गटात पूर्वार्धातील ०५-११ अशा पिछाडीवरून वास्को स्पोर्टस्‌चा १८-१५ असा पाडाव केला. जावेद व एजाज या चौधरी बंधुच्या आक्रमक खेळाला याचे श्रेय जाते. वास्कोच्या मयुरेश वाघ, सुजल गायकर यांचा खेळ उत्तरार्धात कमी पडला.

ओम् संघाने क गटात छत्रपती शाहू संघावर २७-२२ असा विजय मिळविला. यग्नेश भोपी, प्रसाद यांच्या चढाई, पकडीच्या खेळाने त्यांनी ही किमया केली. छत्रपती शाहूच्या सुगंध राजभर याने एकाकी लढत दिली. रॅडीकल स्पोर्टस्‌ने ई गटात ओम् वर्तक ठाणे संघाचा २९-२५ असा पराभव केला. साई ठाकूर, यश म्हात्रे विजयी संघाकडून, तर यश कदम, सार्थक खाडे पराभूत संघाकडून उत्कृष्ट खेळले.

जय बजरंग संघाने बाद फेरी गाठताना प्रथम वीर तानाजीचा ३६-१५ असा आणि नंतर बालगोपाळ मंडळाचा ३६-१८ असा पाडाव केला. नेहाला गायकर, आशिष सुतार, जयेश गायकवाड यांच्या चतुरस्त्र खेळाने हे दोन्ही विजय सोपे झाले. श्री विठ्ठल मंडळानेदेखील ज गटात दोन विजय मिळवीत बाद फेरी गाठली. श्री विठ्ठल संघाने प्रथम वेताळ मंडळाला २८-२६ असे नमवीत, तर नंतर विश्वविधाता मंडळावर ३०-०९ अशी मात करीत बाद फेरी गाठली. निलेश मांडगे, कार्तिक बाटे, उमाकांत खाडे, ओमकार यांच्या खेळाने हे शक्य झाले.

# स्केटिंगमध्ये श्रवण पांचाळला दुहेरी ‘रौप्य’




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

घणसोलीतील सेंट्रल पार्क येथे रोलर सर इंडियातर्फे आयोजित फ्रीस्टाइल स्केट कार्टून जिल्हा चॅम्पियनशिपमध्ये नवीन पनवेल येथील श्रवण मिलिंद पांचाळ या आठ वर्षे वयाच्या स्पर्धकाने दोन रौप्यपदकांची कमाई केली.

स्पर्धेत नवी मुंबई तसेच रायगड जिल्ह्यातील ५ ते १६ वयोगटातील जवळपास १५० खेळाडूंनी भाग घेतला होता. न्यू होरायझन पब्लिक स्कूलमध्ये इयत्ता तिसरीत शिकत असलेल्या श्रवण पांचाळने शिक्षक विकी सावंत यांच्या मार्गदर्शनाखालील रूपेरी यश संपादन केले.

या यशाबाबत शिवगिरी सेवा संस्थानचे अध्यक्ष प्रसाद दिलीप खोत, आणि पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडचे सचिव अरुण पाटकर, सदस्य संदीप पाटकर, सुभाष टेंबे यांनी श्रवणचे अभिनंदन केले.

# नेमबाज सोनमसह भारतीय संघाला रौप्य



**नागोया : वृत्तसंस्था**

जपानमधील आयची-नागोया येथे सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या सोनम मस्करने उल्लेखनीय कामगिरी करत भारताला रौप्यपदक मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. महिलांच्या १० मीटर एअर रायफल संघ प्रकारात भारतीय संघाने रौप्यपदक पटकावले असून या कामगिरीत सोनमचा मोलाचा वाटा आहे.

भारतीय संघाने या प्रकारात एकूण १८९८.० गुण मिळवले. त्यापैकी सोनमने वैयक्तिक ६३४.१ गुण मिळवत संघातील सर्वोत्तम कामगिरी नोंदवली. त्यामुळे तिच्या कामगिरीचे विशेष कौतुक होत आहे. सोनम ही सध्या पश्चिम रेल्वेत कनिष्ठ लिपिक म्हणून कार्यरत आहे. तिने दिल्ली आणि कोल्हापूरसह मुंबईतील कामगार क्रीडा भवनाच्या शूटिंग रेंजमध्ये सराव केला आहे.

# ‘सीकेटी’च्या कुस्तीपटूंचे जिल्हास्तरीय ग्रीकोरोमन स्पर्धेत सुयश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक संचालनालय, रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय आणि पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने २४ सप्टेंबर रोजी प.जो. म्हात्रे विद्यालय, नावडे येथे आयोजित जिल्हास्तरीय १७ व १९ वर्षांखालील मुले व मुली कुस्ती (ग्रीकोरोमन) स्पर्धेत नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले.

सुदेश हरिचंद्र बैदू (इ. १२वी), जितेश अर्जुन सुरते (इ. ११वी), दक्षता प्रकाश रिसबूड (इ. १२वी), कीर्ती अमोल घोलप (इ. ११वी), महिमा संजय महाडिक (इ. १२वी) या कुस्तीपटूंनी प्रथम क्रमांक प्राप्त केला.

सर्व कुस्तीपटूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे तसेच ओम दीपक वाघ (इ. ११वी) याने द्वितीय क्रमांक, तर कैलास मंगीलाल चौधरी (इ. ११वी), साहिल विजयकुमार गावडे (इ. ११वी), रिशल संतोष ठाकूर (इ. १२वी) यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.



कुस्ती स्पर्धेत खेळाडूंनी मिळवलेल्या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, स्वाती पाटील, क्रीडा शिक्षक अरुण पाटील, मनोज पाटील, माधवी कोळी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# एशियन गेम्समधील पुरुष क्रिकेट स्पर्धेत ‘पावसाचा खेळ’

**टोकियो : वृत्तसंस्था**


एशियन गेम्समधील पुरुष क्रिकेट स्पर्धेत वारंवार पावसाचा व्यत्यय येत असल्याचे दिसत आहे. त्यामुळे सामन्याशिवायच आयसीसी मानांकित संघांना पुढच्या फेरीचे तिकीट मिळत आहे.

उपांत्यपूर्व फेरीचे दोन सामने (पाकिस्तान विरुद्ध हाँगकाँग आणि भारत विरुद्ध अफगाणिस्तान) पावसामुळे रद्द झाले. आयसीसी मानांकनाच्या आधारावर भारत आणि पाकिस्तान या दोन्ही संघांना फायदा झाला आणि उपांत्य फेरीचे तिकीट मिळाले. भारताचा उपांत्य फेरीचा सामना नेपाळ आणि श्रीलंका यांच्यातील विजेत्याशी होईल, तर पाकिस्तानचा उपांत्य फेरीचा सामना बांगलादेश आणि श्रीलंका यांच्यातील विजेत्याशी होईल.

आता उपांत्य फेरीत पाऊस पडला आणि सामना रद्द झाला, तर भारताला फायदा होईल. भारतीय संघ आयसीसी टी-२० रँकिंगमध्ये नंबर १वर असल्याने अंतिम फेरीचे तिकीट मिळेल. दुसरीकडे पाकिस्तानचे टी-२० रँकिंग बांगलादेश किंवा मलेशियापेक्षा सरस असल्यामुळे त्यांच्यातील सामना रद्द झाल्यास पाकिस्तान थेट फायनलमध्ये प्रवेश करेल.

तसे झाल्यास अंतिम फेरीत भारत आणि पाकिस्तान यांच्यात लढत होईल. जर या सामन्यात पाऊस पडला तर पदक विभागून दिले जाईल.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com